❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २३३ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# २१ ऑगस्टला केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार

## धर्मेंद्र प्रधान यांचे मंत्रिमंडळात पुनरागमन?



■ मुंबई (दै. संध्या)

गेल्या काही दिवसांपासून केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराबाबत संपूर्ण देशात चर्चा आहे. अशातच आता या विस्ताराची तारीख समोर आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार 21 ऑगस्टला केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता आहे. यात काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. त्याच बरोबर धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर शिक्षण खात्याची जबाबदारी कोणत्या नेत्याला मिळणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रात जाणार का? या बहुचर्चित प्रश्नाचे उत्तरही 21 ऑगस्टला मिळणार आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, 21 ऑगस्टला केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता आहे. 2024 साली मोदी सरकारचा शपथविधी झाल्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाचा एकदाही विस्तार झालेला नाही. त्यामुळे मोदी सरकारच्या या पहिल्याच मंत्रिमंडळ विस्ताराकडे देशाचं लक्ष लागले आहे. या मंत्रिमंडळ विस्तारात नेमकी कुणाला संधी मिळणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराबाबत अनेक प्रश्न समोर येत आहेत. यात सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे काही दिवसांपूर्वी शिक्षणमंत्रीपदाचा राजीनामा दिलेल्या धर्मेंद्र प्रधानांची कॅबिनेटमध्ये पुन्हा एन्ट्री होणार का? हा आहे. विद्यार्थी आंदोलनामुळं राजीनामा द्यावा लागलेल्या धर्मेंद्र प्रधान यांची मंत्रिमंडळात पुन्हा एन्ट्री होणार का याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीत जाणार की महाराष्ट्रातच राहणार? या प्रश्नाचेही उत्तर समोर येणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत जात पंतप्रधान मोदींची भेट घेतली. त्यानंतर फडणवीस माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, निर्मला सीतारमण आणि भूपेंद्र यादव यांनाही भेटले. त्यामुळं फडणवीस केंद्रात जाणार की महाराष्ट्रातच राहणार अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. मात्र केंद्रात जाण्याच्या चर्चांचं फडणवीसांनी खंडन केलं आहे, मी महाराष्ट्रातच राहणार असल्याचं फडणवीसांनी म्हटलं आहे. दरम्यान, पियूष गोयल यांचं वाणिज्य मंत्रालय जाणार की राहणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. त्याचबरोबर गजेंद्रसिंह शेखावत यांचं पर्यटन मंत्रालय जाणार की राहणार? याबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. कारण पर्यटन मंत्रालय पंतप्रधान स्वत:जवळ ठेवणार असल्याची माहिती समोर आली आहे.

# पुण्यात महा-जमावबंदी लागू!

मोर्चे , निदर्शने अन् सोशल मीडियावरील रिल्सवर थेट बंदी; नव्या आदेशामुळे शहरात खळबळ

■ पुणे (दै. संध्या)

आगामी सण, राजकीय-सामाजिक कार्यक्रम आणि विविध आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात १४ दिवसांसाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. १८ ऑगस्टपासून ३१ ऑगस्टपर्यंत हे आदेश लागू राहणार असून, मोर्चे, मिरवणुका, शस्त्रे बाळगणे तसेच सोशल मीडियावरील भडकावू कंटेंटवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

पोलीस उपआयुक्त (विशेष शाखा) डॉ. प्रशांत अमृतकर यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ मधील कलम ३७(१), ३७(२) आणि ३७(३) अंतर्गत हे आदेश जारी केले आहेत. १८ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२.०१ वाजल्यापासून ३१ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत या आदेशांची अंमलबजावणी केली जाणार आहे. पुणे शहरात विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांकडून मोर्चे, निदर्शने, बंद आणि आंदोलने आयोजित केली जातात. तसेच अतिक्रमणविरोधी कारवाई आणि इतर संवेदनशील विषयांवरून तणाव निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन कायदा-सुव्यवस्था आणि सार्वजनिक शांतता कायम ठेवण्यासाठी हे प्रतिबंधात्मक पाऊल उचलण्यात आले आहे. या आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी शस्त्रे, दगड, ज्वलनशील किंवा स्फोटक पदार्थ तसेच इतरांना शारीरिक इजा पोहोचवण्यासाठी वापरता येतील अशा वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच व्यक्ती, नेते किंवा संस्थांचे प्रतीकात्मक पुतळे, प्रतिमा अथवा मूर्ती सार्वजनिक ठिकाणी अशा पद्धतीने प्रदर्शित करणे किंवा जाळणे, ज्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, यावरही निर्बंध राहणार आहेत. सार्वजनिक ठिकाणी भडकावू भाषणे करणे, आक्षेपार्ह किंवा चिथावणीखोर घोषणा देणे, समाजातील सलोखा बिघडवणारी गाणी किंवा कृती करणे यावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. अशा प्रकारांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास संबंधितांवर कारवाई केली जाऊ शकते. सोशल मीडियावर गुन्हेगारांचे उदात्तीकरण करणारे व्हिडिओ तयार करणे किंवा प्रसारित करणे, धमकी देणे, दहशत निर्माण करणे किंवा कायदा-सुव्यवस्थेवर परिणाम करणारा भडकावू डिजिटल मजकूर प्रसारित करणे यावरही पोलिसांकडून कारवाई केली जाणार आहे.

### परवानगी आवश्यक

पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा मेळावा, रॅली किंवा मिरवणूक आयोजित करण्यासाठी पुणे पोलिसांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. विनापरवानगी अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केल्यास किंवा त्यामध्ये सहभागी झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

## थोडक्यात...

### गडकरींचा मास्टर प्लॅन!

पुणे : दैनिक संध्या

पुणे ते छत्रपती संभाजीनगर हा प्रवास अवघ्या दोन तासांत पूर्ण व्हावा, हे माझं स्वप्न असून त्यासाठी शानदार महामार्ग विकसित केला जात आहे, अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. या सहापदरी महामार्गामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगर आणि तिथून पुढे नागपूरपर्यंतचा प्रवास अत्यंत जलद आणि सुलभ होणार असून त्यासाठी विमानाची गरज नसेल असंही गडकरी म्हणाले. तसेच मुंबई ते बंगळुरू हा प्रवास पाच तासात होईल, असे रस्ते बनवण्यात येत असल्याचं गडकरींनी सांगितलं. पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी बोलताना गडकरी यांनी सांगितले की, पुण्यात सध्या वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. यावर मात करण्यासाठी येत्या दोन वर्षांत पुणे आणि आसपासच्या परिसरासाठी तब्बल 60 हजार कोटी रुपयांच्या विविध रस्ते प्रकल्पांची कामे केली जाणार आहेत. यामध्ये 31 हजार 600 कोटी रुपयांच्या शिरूर ते पुणे प्रकल्पाचाही समावेश आहे. गडकरी यांनी पुण्यातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची माहिती दिली. हडपसर-यावत मार्गासाठी 5,265 कोटी रुपये, तळेगाव-चाकण-शिक्रापूर या 53 किमीच्या टप्प्यासाठी 4 हजार कोटी रुपये, तर शिरूर ते संभाजीनगर 192 किमी मार्गासाठी 15 हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याशिवाय खेड ते नाशिक फाटा 30 किमीसाठी 8 हजार कोटी, रावेत ते नऱ्हे 6 हजार कोटी आणि पुणे ते सोलापूर मार्गासाठी 8 हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे.

### एकनाथ शिंदे काँग्रेसमध्ये येणार होते

मुंबई : दैनिक संध्या

राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी कराड आणि मुंबईतील पत्रकार परिषदेत बोलताना भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे काँग्रेसमध्ये येणार असल्याचं म्हटलं होतं. यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हुसेन दलवाई यांनी देखील एकनाथ शिंदे देखील काँग्रेसमध्ये येणार होते मात्र काँग्रेसच्या काही नेत्यांनी त्यांचा प्रवेश होऊ दिला नव्हता असं म्हटलं. यावर पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हुसेन दलवाई यांच्या एकनाथ शिंदे यांच्याबाबतच्या वक्तव्यासंदर्भात विचारलं असता पृथ्वीराज चव्हाण यांनी हा नवीन विषय असल्याचं म्हटलं. एकनाथ शिंदे आणि आमची चर्चा झाली होती. मात्र काय झाली ते सांगणार नाही, अशी भूमिका चव्हाण यांनी घेतली. एखनाथ शिंदे आमचे मित्र आहेत ते आमचं काम करत नाहीत मात्र आजही आमचे मित्र आहेत ते आमच्या जिल्ह्यातले आहेत.आमच्या अनेक गाठीभेटी झाल्या होत्या मात्र त्यावर मी बोलणार नाही, असं पृथ्वीराज चव्हाण यांनी स्पष्ट केलं.

### १४ वर्षीय मुलीसोबत घाणेरडं कृत्य

वसई : दैनिक संध्या

नालासोपारा येथे एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर सामूहिक लैंगिक अत्याचार झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. सोशल मीडियावर ओळख झालेल्या एका मुलाने पीडित मुलीला भेटायला बोलावले असता त्याने एका साथीदारासोबत अल्पवयीन मुलीला धमकावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले. या घटनेप्रकरणी पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे.

# ओबीसी आरक्षणाला ५० टक्क्यांची मर्यादा

## १५ जिल्ह्यांतील ५१२ सरपंचपदे खुल्या प्रवर्गात

■ पुणे (दै. संध्या)

ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ओबीसी आरक्षणाबाबत राज्य सरकारने महत्त्वाचा सुधारित आदेश काढला आहे. ओबीसी आरक्षणाची एकूण मर्यादा 50 टक्क्यांच्या आत ठेवण्याच्या राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर 15 जिल्ह्यांतील सरपंचपदांच्या आरक्षणात मोठा बदल करण्यात आला आहे. या निर्णयामुळे ओबीसींसाठी आरक्षित असलेली तब्बल 512 सरपंचपदे कमी होऊन ती खुल्या प्रवर्गात वर्ग करण्यात आली आहेत. राज्य निवडणूक आयोगाने 30 एप्रिल 2026 रोजी ग्रामपंचायतींमधील आरक्षण 50 टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार ग्रामविकास विभागाने संबंधित 15 जिल्ह्यांतील सरपंचपदांच्या आरक्षणाचा फेरआढावा घेत सुधारित आदेश जारी केला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या 13 जून 2025 रोजीच्या अधिसूचनेनुसार संबंधित 15 जिल्ह्यांमध्ये ओबीसींसाठी 6,719 सरपंचपदे आरक्षित करण्यात आली होती. त्यापैकी 3,373 पदे महिलांसाठी राखीव होती. मात्र सुधारित आरक्षणानुसार आता ओबीसींसाठी केवळ 6,207 सरपंचपदे राखीव राहणार आहेत. यामध्ये 3,111 पदे महिलांसाठी राखीव असतील. यामुळे ओबीसी आरक्षणातील 512 सरपंचपदे कमी झाली आहेत.

दरम्यान, केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली असली तरी जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात ओबीसींसाठी स्वतंत्र जात रकाना नसल्याने प्रत्यक्ष जातनिहाय गणना कशी होणार, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्यादा कायम ठेवण्याचा हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. एकूणच, आगामी ग्रामपंचायत निवडणुकांपूर्वी झालेल्या या आरक्षण फेरबदलामुळे 15 जिल्ह्यांतील इच्छुक उमेदवारांच्या राजकीय गणितावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, ओबीसींची कमी झालेली 512 पदे आता खुल्या प्रवर्गात वर्ग करण्यात आली आहेत. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील सरपंचपदांची संख्या 13,077 वरून थेट 13,589 झाली आहे. खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव पदांची संख्या देखील 6,541 वरून 6,803 करण्यात आली आहे. हा सुधारित आदेश धुळे, जळगाव, हिंगोली, नांदेड, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि वर्धा या 15 जिल्ह्यांना लागू आहे.

# भाजपा कार्यकारिणीत मोठे फेरबदल



■ मुंबई (दै. संध्या)

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी आपल्या नव्या टीमची घोषणा केली आहे. नव्या राष्ट्रीय टीममध्ये अनेक ज्येष्ठ नेत्यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. पक्षाने राष्ट्रीय उपाध्यक्ष, राष्ट्रीय महासचिव आणि राष्ट्रीय कोषाध्यक्ष यांसह विविध पदांवरील नियुक्त्यांची घोषणा केली आहे. यात उत्तर प्रदेशसह महाराष्ट्र आणि इतरही महत्त्वाच्या राज्यांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. भाजपच्या या निर्णयातील 5 महत्त्वाचे मुद्दे जाणून घेऊयात.

भाजपच्या नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा झाली आहे. या कार्यकारिणीत महाराष्ट्रातून 5 चेहऱ्यांना मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. विनोद तावडेंना राष्ट्रीय सरचिटणीस पदावर कायम ठेवण्यात आलं आहे, तर पियुष गोयल यांची कोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. भारती पवार यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे, शिवप्रकाश यांची राष्ट्रीय सहसंगठन मंत्री पदावर फेरनिवड करण्यात आली आहे. तसेच सोशल मीडिया सहसंयोजक म्हणून प्रीती गांधी यांना संधी देण्यात आली आहे. पुढील वर्षी उत्तर प्रदेशात विधानसभा निवडणुका पार पडणार आहे. ही निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रीय कार्यकारिणीत उत्तर प्रदेशच्या सर्वाधिक 6 पदाधिकाऱ्यांना संधी देण्यात आली आहे.उत्तर प्रदेशातून तारिक मन्सूर आणि रेखा वर्मा यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी, स्मृती इराणी आणि हरीश द्विवेदी यांची राष्ट्रीय महामंत्रीपदी, तर डॉ. भोला सिंह आणि संगीता यादव यांची राष्ट्रीय मंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच अमरपाल मौर्य यांच्याकडे ओबीसी मोर्चाची, तर कुंवर बासित अली यांच्याकडे अल्पसंख्याक मोर्चाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन स्वतः 46 वर्षांचे आहेत. त्यामुळे त्यांनी आपल्या नव्या केंद्रीय टीममध्ये तरुण चेहऱ्यांना विशेष प्राधान्य दिले आहे. 40 वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या 6 सदस्यांना, 40 ते 49 वयोगटातील 15 सदस्यांना आणि 50 ते 59 वयोगटातील 21 सदस्यांना राष्ट्रीय टीममध्ये स्थान देण्यात आले आहे. हा एक महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. नितीन नबीन यांच्या नव्या केंद्रीय कार्यकारिणीत महिलांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. पक्षाच्या संविधानानुसार संघटनेत 33 टक्के महिला आरक्षणाची तरतूद आहे आणि नव्या टीमच्या गठनात त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. भाजपच्या नव्या टीममधील एकूण 13 राष्ट्रीय उपाध्यक्षांपैकी 6 महिला आहेत. त्यामुळे हे प्रमाण 33 टक्क्यांपेक्षा जास्त असून जवळपास 50 टक्के आहे.

> भाजपच्या नवीन टीममध्ये दोन मुस्लिम चेहऱ्यांना स्थान देण्यात आले आहे. यामध्ये तारिक मन्सूर यांना राष्ट्रीय उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. तर कुंवर बासित अली यांच्याकडे अल्पसंख्याक मोर्चाची जबाबदारी देण्यात आली आहे. अशा प्रकारे भाजपने अल्पसंख्याक समाजालाही राजकीय संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रा. तारिक मन्सूर हे पसमांदा मुस्लिम समाजातून येतात, तर कुंवर बासित अली हे राजपूत मुस्लिम आहेत. दोन्ही नेते उत्तर प्रदेशातील असून, आगामी निवडणुकांच्या दृष्टीने त्यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.

# आयएसआयचे मोठे कट-कारस्थान उधळले : शाह

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

स्वातंत्र्यदिनाचा उत्सव देशभरात उत्साहात पार पडत असतानाच भारताच्या सुरक्षा यंत्रणांनी सीमेपलिकडून होणाऱ्या दहशतवादी कारवायांचा एक मोठा कट उधळून लावला आहे. पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय समर्थित आणि पाकिस्तानस्थित दहशतवादी 'शहजाद भट्टी नेटवर्क' वर देशभरातील १४ राज्यांमध्ये एकाच वेळी धडक कारवाई करत सुरक्षा यंत्रणांनी हे जाळे पूर्णपणे नष्ट केले आहे. या मोहिमेदरम्यान २५३ जणांना ताब्यात घेण्यात आले असून २०० हून अधिक संशयित दहशतवादी आणि त्यांच्या हस्तकांना अटक करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' (X) वरून या देशव्यापी कारवाईची माहिती देत सुरक्षा यंत्रणांच्या कामगिरीचे कौतुक केले आहे.

गृहमंत्री अमित शाह यांनी स्पष्ट केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने स्वातंत्र्यदिनापूर्वी सीमेपलिकडून होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांची मोठी योजना उधळून लावली आहे. "भारतीय सुरक्षा दलांनी १४ राज्यांमध्ये विविध ठिकाणी अत्यंत सूक्ष्म नियोजन आणि समन्वयाने केलेल्या मोहिमेत या संपूर्ण नेटवर्कचे धिंडवडे काढले आहेत. भारताचे दहशतवादाविरुद्ध असलेले 'झिरो टॉलरन्स' धोरण या कारवाईतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे," असे शाह यांनी नमूद केले. गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, १२ ऑगस्ट रोजी रिअल-टाइम इंटेलिजन्स शेअरिंग सिस्टीमचा वापर करून राज्य पोलिसांच्या सहकार्याने ही मोहीम राबवण्यात आली. यामध्ये उत्तर प्रदेशातून ६२, हरियाणातून ५२, दिल्लीतून ५१, पंजाबमधून ४४, राजस्थानमधून १५, महाराष्ट्रातून ८, उत्तराखंडमधून ५, कर्नाटक, गुजरात आणि बिहारमधून प्रत्येकी ३, तर तेलंगणा, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि केरळमधून प्रत्येकी २ जणांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणांमध्ये बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा (UAPA), भारतीय न्याय संहिता (BNS), शस्त्र कायदा आणि स्फोटक पदार्थ कायद्यांतर्गत ८० हून अधिक गुन्हे (FIR) दाखल करण्यात आले आहेत. याशिवाय हेरगिरीसाठी वापरले जाणारे अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरेही जप्त करण्यात आले आहेत. शहजाद भट्टी नेटवर्क हे भारतातील पोलीस ठाणी, लष्करी आस्थापना आणि प्रमुख धार्मिक स्थळांची रेकी करण्यासाठी स्थानिक तरुणांना आणि हस्तकांना पैशांचे आमिष दाखवत असे. या ठिकाणांवर पाळत ठेवण्यासाठी आणि माहिती पाकिस्तानमधील आकांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे कॅमेरे आणि डिजिटल उपकरणांचा वापर केला जात होता.

राष्ट्रीय तपास यंत्रणा गेल्या काही काळापासून शहजाद भट्टी आणि त्याच्या नेटवर्कचा मागोवा घेत होती. मार्च २०२५ मध्ये पंजाबमधील जालिंधर येथे एका सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरच्या घराबाहेर झालेला ग्रेनेड हल्ला, नोव्हेंबर २०२५ मध्ये हरियाणातील सिरसा येथील महिला पोलीस ठाण्यातील स्फोट, तसेच जानेवारी २०२६ मध्ये अंबाला येथील बलदेव नगर पोलीस ठाण्याजवळ झालेला कार बॉम्ब स्फोट यांसारख्या गंभीर घटनांमध्ये भट्टी नेटवर्कचा थेट हात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. एनआयएने भट्टी आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध यापूर्वीच आरोपपत्र दाखल केले असून त्याला फरार घोषित केले आहे. गृह मंत्रालयाच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईमुळे देशातील प्रमुख शहरांमध्ये आणि संवेदनशील स्थळांवर होणारे संभाव्य ग्रेनेड, आयईडी व पेट्रोल बॉम्ब हल्ले टळले आहेत. महाराष्ट्र, दिल्ली आणि उत्तर प्रदेशसह सर्व संबंधित राज्यांमधील स्थानिक पोलीस आता या अटक करण्यात आलेल्या संशयितांची कसून चौकशी करत असून त्यांचे इतर स्थानिक साथीदार किंवा आश्रयदाते शोधण्याचे काम वेगाने सुरू आहे. देश सुरक्षित ठेवण्यासाठी आणि सीमापार दहशतवादाची पाळेमुळे छाटण्यासाठी भारतीय सुरक्षा यंत्रणा यापुढेही अशीच कठोर पावले उचलत राहतील, असा पुनरुच्चार प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

### जप्त केलेला मोठा साठा आणि हेरगिरीचे जाळे

सुरक्षा दलांनी छापेमारी दरम्यान संशयितांकडून मोठ्या प्रमाणावर प्राणघातक शस्त्रे, स्फोटके आणि तंत्रज्ञान साहित्य हस्तगत केले आहे. जप्त करण्यात आलेल्या साहित्यात इम्प्रोव्हाइज्ड एक्स्प्लोसिव्ह डिव्हाईस, पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि विशेष म्हणजे 'पाकिस्तान ऑर्डनन्स फॅक्टरी'चे स्पष्ट मार्किंग असलेले हँड ग्रेनेड्स सापडले आहेत. यावरून या नेटवर्कचा थेट पाकिस्तानशी आणि तिथल्या लष्करी-गुप्तचर व्यवस्थेशी संबंध असल्याचे उघड झाले आहे.



# तरुणीला केला किळसवाणा स्पर्श!

■ पुणे (दै. संध्या)

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर सिंहगडावर पर्यटकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. मात्र, या गर्दीच्या तुलनेत सुरक्षा आणि गर्दी व्यवस्थापनाची व्यवस्था अपुरी पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. गर्दीचा गैरफायदा घेत काही तरुणांनी तरुणींशी असभ्य वर्तन केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. तसेच दोन गटांमध्ये हाणामारी आणि दगडफेकीच्या घटनाही घडल्याने सिंहगडावरील पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त सिंहगडावर पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. मात्र, गर्दीच्या प्रमाणात सुरक्षारक्षक आणि पोलिसांची उपस्थिती पुरेशी नसल्याने गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात अडचणी निर्माण झाल्याचे दिसून आले. याच गर्दीचा काही तरुणांनी गैरफायदा घेत तरुणींना जाणूनबुजून चुकीचा स्पर्श केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. त्यामुळे पर्यटकांमध्ये नाराजी आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. सिंहगडावर गर्दीच्या काळात दोन गटांमध्ये वाद होऊन हाणामारी झाल्याचेही समोर आले आहे. काही ठिकाणी दगडफेक झाल्याची माहिती आहे. यापूर्वीही सिंहगडावर पर्यटकांमध्ये वाद, मारामारी आणि अन्य अनुचित प्रकार घडले आहेत. दरम्यान, रविवारी रात्री उशिरापर्यंत या प्रकरणी हवेली पोलिसांकडे कोणतीही तक्रार दाखल झालेली नव्हती. सिंहगडावर स्वातंत्र्यदिन, रविवार आणि इतर सुट्यांच्या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक दाखल होतात. त्यामुळे या काळात प्रवेशाचे नियोजन, वाहतूक नियंत्रण, गर्दीचे व्यवस्थापन आणि सुरक्षेसाठी अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्याची गरज आहे.

## संपादकीय

# स्वातंत्र्यदिनाचे माहात्म्य!

दर वर्षी १५ ऑगस्टची सकाळ दिल्लीकरांसाठी खास असते. लाल दगडांच्या ऐतिहासिक भव्य तटबंदीवर फडकणारा तिरंगा, सकाळची पाऊसओली दिल्ली, कडक सुरक्षा या वातावरणात हजारो पावलं लाल किल्ल्याकडं निघालेली असतात. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेली मुलं-मुली, लाल किल्ल्यावर जाण्यासाठी रात्रीपासून रेल्वे आणि बसस्थानकांवर आलेले देशाच्या अनेक भागांतील नागरिक, अनेक देशांचे राजदूत आणि विविध क्षेत्रांतील निमंत्रित... प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उस्फूर्ततेचं शिंपण दिसतं. हा सोहळा पूर्ण संपेपर्यंत मंडी हाऊस, आयटीओ, जामा मशीद, दिल्लीगेट या भागांत प्रचंड कडक सुरक्षाव्यवस्था असते. यंदाचा स्वातंत्र्यदिन शनिवारी आलाय. त्यानिमित्तानं याआधी शनिवारी आलेल्या १२ स्वातंत्र्यदिनांचा धावता आढावा घेणं उचित ठरावं. सन १९४७ नंतर १५ ऑगस्ट शनिवारी येण्याचा यंदाचा तेरावा प्रसंग आहे. १९५३, १९५९, १९६४, १९७०, १९७६, १९८१, १९८७, १९९२, १९९८, २००९, २०१५ आणि २०20या बारा शनिवारांकडे मागे वळून पाहिले, तर बदलत्या भारताच्या राजकीय चेहऱ्याचं एक वेगळंच पण आशादायक चित्र दिसतं. स्वातंत्र्य मिळून अवघी सहा वर्षे झाली होती, त्या १९५३ मधील शनिवारी आलेल्या स्वातंत्र्यदिनी जवाहरलाल नेहरू लाल किल्ल्यावर होते. त्या काळात घोषणा कमी आणि दिशादर्शन अधिक असायचं. फाळणीच्या जखमा, लाखो निर्वासितांचे उग्र प्रश्न, दारिद्र्य, बेरोजगारी आणि नव्या लोकशाही संस्थांची उभारणी अशी प्रचंड आव्हानं होती त्या काळात नेहरूंच्या त्या भाषणाचं शीर्षकच होतं- 'इंडिया फेसेस ट्रिमेंडस टास्क्स्'. त्यानंतरच्या १९५९ मधल्या शनिवारी लाल किल्ल्यावर पंडित नेहरूच होते पण... काहीसे थकत चाललेले... पंडितजींच्या त्या भाषणाचं शीर्षक होतं 'प्रगतीसाठी प्रयत्न'. देशाची खरी प्रगती शहरांवर नव्हे, तर लाखो गावांच्या विकासावर आहे, असं सांगताना पंडितजींनी राष्ट्रनिर्मितीत नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे, असं सांगितलं. आजही देशाच्या नेतृत्वाला तसाच संदेश द्यावा लागतोय, याचं आत्मपरीक्षण तुम्ही-आम्ही करणार का नाही? नंतर १९६४ मधल्या शनिवारी पं. नेहरूंच्या निधनानंतर पंतप्रधान झालेल्या लालबहादूर शास्त्रींच्या व्यक्तिमत्त्वात मूर्तिमंत साधेपणा आणि कर्तव्यनिष्ठा होती. अन्नटंचाई, आर्थिक संकट आणि पाकिस्तानबरोबरचा संघर्ष या पार्श्वभूमीवर पुढं शास्त्रीजींनी 'जय जवान, जय किसान,' या घोषणेसह दोन आधारस्तंभांना राष्ट्रीय सामर्थ्याशी जोडलं. नंतर १९७० पर्यंत भारताचं राजकारण अधिक संघर्षमय झालं होतं. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्ये फूट पडली होती, बँकांचं राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे प्रश्न आणि आर्थिक विषमता या जोडीला 'गरिबी हटाओ' ही घोषणा त्या काळातली राजकारणाची ओळख बनली होती. नंतर १९७६ चा शनिवार देशाच्या इतिहासातील सर्वांत विरोधाभासी स्वातंत्र्यदिनांपैकी एक ठरला. देशात आणीबाणी लागू होती. तमाम विरोधी नेते तुरुंगात होते, प्रसारमाध्यमांवर (उघडपणे) सेन्सॉरशिप होती. नंतर १९८१ मध्ये पुन्हा शनिवारी स्वातंत्र्यदिन आला आणि सत्तेत परतलेल्या इंदिरा गांधी पुन्हा लाल किल्ल्यावर होत्या. १९८७ मधल्या शनिवारी राजीव गांधी यांच्या रूपानं देशाला तरुण पंतप्रधान मिळाले होते. संगणक, दूरसंचार, आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रशासनातील सुधारणांची नवी भाषा आकार घेत होती. देशाच्या एका पंतप्रधानांचा दहशतवादानं बळी घेतल्यानं त्या काळात सुरक्षेचं स्वरूपही बदललं होतं व भक्कम सुरक्षा-कवचाच्या आवरणाखाली पंतप्रधानांना लाल किल्ल्यावरून प्रथमच बोलावं लागलं. नंतर १९९२ च्या स्वातंत्र्यदिनी पी. व्ही. नरसिंह राव लाल किल्ल्यावर होते तेव्हा १९९१ च्या आर्थिक संकटानंतर भारतानं आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला होता. त्याच वेळी देश धार्मिक ध्रुवीकरण आणि सामाजिक तणावातून जात होता. रामरथयात्रेनं वातावरण तप्त होतं. पोखरण अणुचाचण्यांनंतर भारताच्या आत्मविश्वासाला नवं परिमाण मिळालं तेव्हा १९९८ च्या शनिवारी अटलबिहारी वाजपेयी यांनी लाल किल्ल्यावरच्या भाषणात राष्ट्रीय सुरक्षा, वैज्ञानिक सामर्थ्य आणि शांतता यांचा समतोल साधताना 'जय जवान, जय किसान'मध्ये 'जय विज्ञान' जोडण्याचा संदेश दिला.

## संस्कृत सुभाषित

वासनाना क्षयश्चात स्वाध्मासापनमं करू

अर्थ : मन निरंतर स्वस्वरुपीच राहून लयास जाते आणि त्यामुळेच वासनांचा क्षय होतो. म्हणून मनोविजय प्राप्त कर असे सांगितले आहे.

## गुरु वचन

### कुशल मार्गदर्शन

एका प्रयोगशाळेत काही विद्यार्थी प्रयोग करत होते. यावेळी दोन विद्यार्थ्यांकडून मोठी चूक झाली. त्यांना वाटले की, आता त्यांना कठोर शिक्षा मिळेल. प्रयोगशाळा त्यावेळी प्रसिद्ध वैज्ञानिकाने काही दिवसांपूर्वीच सुरु केली होती. दोन्ही विद्यार्थी घाबरत–घाबरत त्यांच्याजवळ गेले. वैज्ञानिकाने त्यांना घाबरलेले पाहून विचारले, काय झाले? यावर एक विद्यार्थी घाबरत–घाबरत म्हणाला, सर इलेक्ट्रिक मिटर खराब झाले आहे. यामुळे त्याच्यात खूप जास्त करंट पसरला आहे. हे ऐकून वैज्ञानिक सुन्न झाला. नंतर त्याने स्वत:ला सावरले आणि म्हणाला, अरे फक्त एवढ्या छोट्या गोष्टीसाठी तुम्ही दोघे एवढे परेशान आहात. विद्यार्थी जेव्हा प्रयोग करतात तेव्हा अशा गोष्टी घडतच असतात. जर विद्यार्थ्यांनी चूका केल्या नाहीत तर ते शिकतील कसे? परंतु भविष्यात प्रयोग करताना मात्र अवश्य सावधानी बाळगायला हवी. ज्यामुळे अशा प्रसंगापासून वाचता येईल. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकाचे म्हणणे ऐकूल्यानंतर वैज्ञानिकाप्रती त्यांच्या मनात आदर निर्माण झाला. तथापि, जी चूक या दोन्ही विद्यार्थ्यांकडून झाली होती. त्यामुळे एका खूप महागडे आणि महत्त्वाचे यंत्र पूर्णपणे जळाले होते आणि ते यंत्र सध्या बाजारात उपलब्ध नव्हते. एवढेच नव्हे तर ते यंत्र जळाल्यामुळे अनेक महत्त्वपूर्ण प्रयोगही थांबले होते. परंतु वैज्ञानिक या नुकसानावर न चिडले न त्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांवर राग व्यक्त केला. तर दोन्ही विद्यार्थ्यांना भयमुक्त केले. त्यानंतर ज्यांनीही हा प्रसंग ऐकला. त्यांनी वैज्ञानिकाची स्तुती केली.

## उपदेशकथा


### फसवी नक्कल

एक नकलाकार अनेकांच्या नकला करून दाखवित होता. प्रेक्षक खूष होते. त्यांनी त्याला डुकराच्या पिलाचा आवाज काढण्यास सांगितले. त्याने तसा आवाज काढला. प्रेक्षकांनाही तो आवडला. ते त्याचे कौतुक करू लागले. इतक्यात एक घोंगडीवाला गावकरी म्हणाला, 'ही नक्कल बरोबर साधली नाही.' प्रेक्षक त्याला म्हणाले, 'मग तू करून दाखव ना' तो रंगमंचावर आला. घोंगडे अंगावर घेतले आणि आवाज काढू लागला. तर प्रेक्षकांनी त्याची खिल्ली उडविली. हेटाळणी केली तेव्हा त्याने घोंगडीत लपवलेले डुकराचे पिलू बाहेर काढले व म्हणाला, 'देखाव्याला भुलणारे तुम्ही लोक. अहो मी घोंगड्यात डुकराचे पिलू लपवून लपवून त्याला चिमटे घेत होतो. ते ओरडत होते तर तुम्ही प्रत्यक्ष डुकराच्या पिलाचा आवाज खोटा ठरवलात. अन् भ्रष्ट नक्कल खरी ठरवलीत. धन्य !'

कथा उपदेश : खोट्या गोष्टींना भुलू नका.

## पंचांग

| पंचांग | विशेष |
|---|---|
| १८ ऑगस्ट २०२६ | सुपोदनवर्ण षष्ठी |
| मंगळवार | मंगळगौरी पूजन |
| विक्रम संवत्– २०८२ | श्रियाळ षष्ठी कल्की जयंती |
| श्रावण शके | |
| संवत्– १९४८ | |
| संवत्सर –पराभवनाम | |
| अयन– दक्षिणयन | |
| मास– श्रावण | |
| ऋतु– सौर वर्षा | |
| शुक्ल पक्ष | |
| तिथि:षष्टी १७:५०:५३ | |
| नक्षत्र:स्वाती (अहोरात्र) | |
| योग:शुक्ल २७:२२:१२+ | |
| करण:तैतिल १७:५०:५३ | |
| करण:गर (अहोरात्र) | |
| सूर्य:सिंह | |
| चन्द्र:तुला | |
| हिजरी सन् – १४४८ | श्रीमंग थोरले |
| मुस्लिम मास – रबिलावल | बाजीराव पेशवे जयंती |
| तारीख – ४ | (तारेखप्रमाणे) |



## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०४३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | 3 | | | | 1 | 9 | |
| 4 | | | 5 | | | | | 2 |
| | 1 | | | | 6 | | 5 | |
| 5 | | | 1 | 3 | 8 | 6 | | 7 |
| | | 6 | | 2 | | 5 | | |
| 7 | | 8 | 9 | 6 | 5 | | | 1 |
| | 8 | | 4 | | | | 1 | |
| 2 | | | | | 3 | | | 5 |
| | 4 | 1 | | | | 8 | | 3 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०४२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 9 | 1 | 7 | 6 | 8 | 5 | 2 | 3 |
| 5 | 3 | 6 | 1 | 2 | 4 | 7 | 9 | 8 |
| 7 | 8 | 2 | 9 | 5 | 3 | 4 | 1 | 6 |
| 6 | 7 | 3 | 2 | 4 | 9 | 8 | 5 | 1 |
| 8 | 4 | 9 | 5 | 7 | 1 | 6 | 3 | 2 |
| 2 | 1 | 5 | 3 | 8 | 6 | 9 | 4 | 7 |
| 3 | 5 | 4 | 8 | 1 | 7 | 2 | 6 | 9 |
| 1 | 2 | 8 | 6 | 9 | 5 | 3 | 7 | 4 |
| 9 | 6 | 7 | 4 | 3 | 2 | 1 | 8 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८३५ – हरकामी पक्कड आणि पान्हा वापरात आली.
- १९०८ – मादाम कामा यांनी पॅरिस येथे भारतीय ध्वज फडकाविला.
- १९४५ – ब्रिटिश संसदेत भारताला स्वातंत्र्य देण्याची घोषणा पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनी केली.
- २००७ – फिलीपीनमध्ये १३ सैनिकांसह ४२ कट्टरवादी ठार झाले.
- २००८ – हैतीमध्ये पावसाने उफनाई नदीचा पूल ओलांडताना एक बस पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली. यात ५० जणांचा मृत्यू झाला.

### राष्ट्रीय

- १९४५ – नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा ज्या अपघातात मृत्यू ओढवला असे मानले जाते तो अपघात या दिवशी घडला.
- २००३ – भैरोसिंग शेखावत यांनी उपराष्ट्रपतिपदाची शपथ घेतली.

### जन्म

- १७०० – पहिल्या बाजीराव पेशवा.
- १८७२ – पं. विष्णु दिगंबर पलुस्कर.
- १९२० – गॉडफ्रे इव्हान्स, इंग्लंडचा यष्टीरक्षक.
- १९३७ – रॉबर्ट रेडफोर्ड, हॉलिवुड अभिनेता.
- १९५२ – प्रा. विलास गीते, अनुवादाचे साहित्य अकादमी पारितोषिक विजेते.

### निधन

- १२२७ – चंगीझ खान, मंगोल सम्राट.
- १५०३ – पोप सहावा अलेक्झांडर 'बोर्गिया पोप'.
- १८७४ – विल्यम वेर्न, पोलादाचा वापर करणारे तंत्रज्ञ.
- १९०० – विजयालक्ष्मी पंडित, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील कार्यकर्ती, संयुक्त राष्ट्रसंघाच्या आम सभेची पहिली महिला अध्यक्ष.

## : SMS :

Teacher: Agar tumhare paas 10 aam hain aur main 4 maang lu to kitne bachenge?
Student: Ek bhi nahi ma'am
Teacher: Kaise?
Student: Kyunki aap maang kar wapas nahi karti

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१ | २३.३ |
| अहमदनगर | ३०.७ | २३ |
| अकोला | ३३.९ | २५.७ |
| अमरावती | ३०.७ | २५.५ |
| बीड | ३४.१ | २७ |
| भंडारा | २७.६ | २५.६ |
| बुलढाणा | ४४.३ | २७.८ |
| चंद्रपूर | ३४.७ | २७.१ |
| चेन्नई | ४१.५ | ३०.९ |
| नवी दिल्ली | ४४.८ | ३२.९ |
| धुळे | ३४.२ | २५.२ |
| गोंदिया | २९.८ | २५.३ |
| जळगाव | ३४.३ | २५ |
| कोल्हापूर | २९.६ | २२.९ |
| लातूर | ३२.१ | २३.९ |
| मुंबई | ३३.९ | २७.५ |
| नागपूर | ३१.४ | २५.७ |
| नांदेड | ३४.२ | २५.४ |
| नंदूरबार | २९.४ | २४.१ |
| नाशिक | २८.८ | २३.४ |
| पुणे | २६.८ | २२.१ |
| पंढरपूर | ३४.४ | २४.१ |
| सातारा | ३०.५ | २२.८ |
| सांगली | ३१.४ | २३.४ |
| सोलापूर | ३४.३ | २४.३ |
| वर्धा | ३२.९ | २६.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. मदतीची अपेक्षा करू नका.

**तुळ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील.

**वृषभ :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे जीवनात बदल घडून येईल.

**धनु :** शुभ रंग:पिवळा,शुभ दिशा:दक्षिण शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल.

**मकर :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील.

**कुंभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व सामान्य स्तरावरची कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राहील. कौटुंबिक समस्या हल होतील.

**मीन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०४३



### आडवे शब्द

१. दृष्टी
३. तात्काळ उत्तर देणारा
८. टाळ्यांचा आवाज
११. भ्रमर, भुंगा
१२. नेत्रकटाक्ष
१३. दशानन
१४. नातेवाईक
१५. पार्थिव
१७. झुणक्याबरोबरची रोटी
१८. बळेच काढलेला मुहूर्त
१९. जाडसर पीठ
२१. विनाश करणारी
२२. नम्र, वाकलेला
२४. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था
२६. पाच दिवसाचा क्रिकेट सामना
३०. फळातील द्रव
३२. आप्त नसलेला
३३. खोटेपणा
३४. सम्राट
३५. खूप, पुष्कळ
३७. वर्षभर, ३९. लाकूड कापण्याचे हत्यार
४१. रत्नमाला, रत्नांची माळ
४३. कापूस
४६. उभाच्या उभा!
४७. उत्कृष्ट बल्लवाचार्य म्हणून प्रसिद्ध असलेला दमयंतीचा पती
५०. अयोध्येचा राजा
५२. उत्तराधिकारी
५४. चंद्र
५५. थंडगार
५७. मातीचा सूक्ष्म कण
५८. कोळिष्टकावरील धागे
६०. श्वासरोग
६१. चणचण, दुर्भिक्ष्य
६२. परमेश्वर
६३. चट्टामट्टा
६५. फूल
६७. पवित्र
६९. सर्वत्र सांगत सुटणे
७१. निपचित
७३. फोडातील द्रव
७४. बलुतोदारी व्यवस्थेतील गावप्रमुख
७६. जन्म
७७. खोल खाई
७८. दरोडा
७९. बाळाच्या हातातील मणिबंध

### उभे शब्द

१. देवीचा उत्सव
२. श्रीविष्णूचे एक नाव
३. उगीच
४. अटीची भाषा
५. लोकसंख्येची मोजणी
६. क्रिकेटमधील अवांतर धाव (इंग्रजी)
७. पुंगी
८. नारायण राणे यांचे गाव
९. कंबरेवर
१०. हजरा किलो
१६. पाठविलेला
१७. लुच्ची
१८. राघोबांचे नारायणरावांशी नाते
२०. वेडावाकडा
२१अ. थंडीची लाट
२३. मऊ
२५. शिकार
२७. सर्प
२८. एक सुगंधी वनस्पती
२९. कुरापत,
३१. मदतनीस
३३. आघात, ३६. बाण
३६अ. मुस्लीम
३८. लोणच्यातील रस
४०. समशेर
४२. अधाशी, लालची
४४. हातातून निसटणारे खनिज
४५. सर्वांना सारखे
४६. नावाडी
४८. तर्क
४९. मनीची इच्छा
५१. संगोपन, लाडकोड पुरवणे
५२अ. ऊभदार पांघरुण
५३. गोंधळ
५६. पोळी भाजण्याचे साधन
५९. माजलेला, गर्वीष्ठ
६०. धमकावणी
६१अ. संधी, मोका
६४. रांग, ६६. हृदय
६८. रोख
६९. पांढुरका रंग
७०. हिंदीत शपथ
७२. तऱ्हा, प्रकार
७४. फलक
७५. नेम, उद्दिष्ट

### जम्बो शब्दकोडे क्र. १०४२ चे उत्तर

आडवे उत्तर
१.सकाळ दुपार संध्याकाळ ८.मधुर १०.नत ११.रातवा १२.गलेलठ्ठ १४.दणका १६.दरवळणे १८.साचा १९.समर २१.सण २२.शनिवार २५.रमराट २७.सरोद ३०.कालवड ३२.अंतराळवीर ३४.सरस ३६.ताल ३७.गजर ३८.कर ३९.कुंतल ४१.नजर ४३.मालवणे ४४.सावज ४६.मातापिता ४७.रमावर ४८.हकनाक ५१.समोर ५२.म
ंजरपाट ५३.मलमल ५५.माग ५७.आजार ५८.सकटनिकट ६०.गो ६१.वजन ६३.टच ६४.बकासूर ६६.सागर ६७.अंबाबाई ६९.कचरा ७१.रवा ७३.श्वसन ७५.मकरंद ७६.पाकळी ७७.आरसा ७८.धनगर

उभे उत्तर : १.सनदशीर २.कातण ३.पारावार ४.रत ५.संवाद ६.कालवण ७.ओले ८.मठ्ठ ९.रजाचा गज करणे १२.गणेश १३.लकवा १५.कासरा १७.रसद २०.मटका २३.निव्वळ २४.रबर २६.मगर २७.सवलत २८.रोड २९.खातरजमा ३१.लताकुंज ३२.अंजन ३३.वीरमाता ३४.सरकारजमा ३५.सरसावणे ३८.कवडीमोल ४०.लवकर ४२.रताळे ४५.वर ४८.हजरजबाबी ४९.नापास ५०.कटकट ५१.सम ५२.मांजा ५३.मकबरा ५४.लटका ५६.गवगवा ५७.आन ५९.टचकन ६२.जर ६५.सुधाकर ६६.सारथी ६८.ईश्वर ७०.पदर ७२.भोक ७४.ससा ७५.मग

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आरपीआय ख्रिश्चन आघाडीच्या १६ नवीन शाखांचे पुण्यात उद्घाटन

पुणे : दैनिक संध्या

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या ख्रिश्चन आघाडीच्या १६ नवीन शाखांचे पुणे शहरात भव्य उद्घाटन करण्यात आले. पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासोबतच समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने या शाखांची स्थापना करण्यात आली आहे. यावेळी पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, नगरसेविका हिमाली कांबळे, सरचिटणीस शाम सदाफुले, सुनिल गवळी, विनोद टोपे, ख्रिश्चन आघाडी अध्यक्ष क्रिस्टोपर राजमनी, महिला अध्यक्षा डोर्थी थॉमस आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ख्रिश्चन समाजातील नागरिकांच्या सामाजिक, शैक्षणिक व विविध प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याबरोबरच संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय आणि समतेच्या विचारांचा प्रसार करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नवीन शाखांच्या माध्यमातून पक्षाचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचविणे, युवकांना संघटनेशी जोडणे तसेच सामाजिक उपक्रमांना चालना देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आगामी काळात पुणे शहरातील विविध भागांत संघटन विस्ताराला अधिक गती देण्यात येणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. कार्यक्रमाला आरपीआय (आठवले)चे पदाधिकारी, ख्रिश्चन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन शाखांच्या पदाधिकाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. संघटनेच्या माध्यमातून समाजाच्या विविध प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. दरम्यान, पुण्यात ख्रिश्चन आघाडीच्या १६ नवीन शाखांची स्थापना झाल्याने आरपीआयच्या संघटनात्मक विस्ताराला बळ मिळणार असून आगामी काळात शहरातील सामाजिक व राजकीय उपक्रमांमध्ये आघाडी अधिक सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.




### स्वातंत्र्यदिनानिमित्त मेडीकव्हर हॉस्पिटलतर्फे ८० निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांचा सन्मान

पुणे : दैनिक संध्या

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत मेडीकव्हर हॉस्पिटल, भोसरी यांच्या वतीने पुणे शहरातील सुमारे ८० निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. देशाच्या सुरक्षेसाठी आणि सेवेसाठी योगदान देणाऱ्या माजी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला मेडीकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. व्यास मौर्य, अमोल मुळे, शुभम काळे आणि डॉ. पूजा निंबाळकर उपस्थित होते. तसेच एक्स-सर्व्हिसमेन डेव्हलपमेंट असोसिएशन, दिघी, पुणेचे अध्यक्ष कॅप्टन भास्कर आंब्रे आणि संयुक्त सचिव तसेच दिघीचे नगरसेवक कॅप्टन कृष्णा सुरुकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. देशसेवेसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करून त्यांच्या शौर्य, त्याग आणि समर्पणाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. “देशाच्या रक्षणासाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या माजी सैनिकांचा सन्मान करणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या शौर्य आणि त्यागामुळे देशाची सुरक्षा अधिक बळकट झाली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने त्यांच्या योगदानाला सलाम करण्याची संधी मिळणे ही आमच्यासाठी विशेष बाब आहे,” असे डॉ. व्यास मौर्य यांनी सांगितले. या उपक्रमातून देशसेवेला सलाम करण्यासोबतच समाजात माजी सैनिकांप्रती आदर आणि कृतज्ञतेची भावना दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.

### नागपंचमी निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पुणे कॅन्टोन्मेंट तर्फे खिचडी व केळी वाटप

पुणे : दैनिक संध्या



नागपंचमी व पहिला श्रावण सोमवार निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघाच्या वतीने प्राचीन शिवमंदिर काळा वाडा समोर नरपतगिरी चौक येथे नागरिकांना खिचडी व केळी वाटपाचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रवादी काँग्रेस पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघाचे कार्याध्यक्ष राहुल तांबे, व्यापारी सेलचे अध्यक्ष अनिल अग्रवाल, तृतीय पंथ पुणे शहराध्यक्ष निर्जला गायकवाड, पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा महिला अध्यक्षा नीता गायकवाड, पुणे शहर महिला उपाध्यक्ष डिंपल इंगळे, यांनी केले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते व पुणे मनपा पीएमटी चे माजी अध्यक्ष भीमराव पाटोळे, सेजल देशपांडे, गुलशन शेख, सुनिता बडेकर, रोशन आरा कुरेशी, दिनेश परदेशी, दिनेश अर्धाळकर, उमेश परदेशी, ईस्तियाक बागवान, संजय भाऊ वारभुवन,महेंद्र लालबिगे, अकील सय्यद, अलीम शेख, नईम शेख, महेश गुंडाले, आदी यावेळी उपस्थित होते.

### ६७.९४ टक्के अर्जांचे डिजिटायझेशन पूर्ण

पुणे : दैनिक संध्या

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाला वेग आला असून, आतापर्यंत ९९.९८ टक्के अर्जांचे वितरण पूर्ण झाले आहे. त्यापैकी ६७.९४ टक्के अर्जांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले तर ३१.९२ टक्के अप्राप्य आहेत. अशी माहिती निवडणूक प्रशासनाकडून देण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राजकीय पक्षांच्या साप्ताहिक बैठकीत याबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी तहसीलदार श्रीमती शीतल मुळे-भामरे आणि निवडणूक नायब तहसीलदार श्री. संतोष सानप यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांमध्ये अर्ज वितरणाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. जिल्ह्यातील ९९.९८ टक्के मतदारांना अर्ज वितरित करण्यात आले आहेत. प्राप्त अर्जांपैकी ६७.९४ टक्के डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे.

# उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाला तंत्रकौशल्य व संधीची जोड हवी

## डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे प्रतिपादन; विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)




“शिक्षणानेच भविष्य घडू शकते, यावर माझा पूर्णपणे विश्वास आहे. मात्र, त्यासाठी आपल्याला योग्यवेळी योग्य संधीही मिळायला हवी. शिक्षणाला नवतंत्रज्ञान, कौशल्य, जिद्द, उद्यमशीलता आणि योग्य संधीची जोड मिळाली, तर आपले भविष्य निश्चितच उज्ज्वल असू शकते," असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले. ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर व्हायला हवा, अशी अपेक्षा उद्योजक व देणगीदार प्रतापराव पवार यांनी व्यक्त केली.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या सेनापती बापट रस्त्यानजीक असलेल्या लतिका गायतोंडे मुलींच्या वसतिगृहात 'पद्मश्री प्रतापराव पवार कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रा'चे उद्घाटन डॉ. माशेलकर यांच्या हस्ते झाले. यावेळी समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्यासह विश्वस्त, कार्यकर्ता, सल्लागार, माजी विद्यार्थी मंडळ सदस्य व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रतापराव पवार यांच्या पुढाकारातून आणि अर्थिक योगदानातून येथे एआय प्रशिक्षण, रोबोटीक्स लॅब, परदेशी भाषा वर्ग सुरु करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना पारंपरिक अभ्यासासोबतच कौशल्य विकास करण्यासाठी हे केंद्र नक्कीच उपयुक्त ठरु शकते. विशेष म्हणजे या प्रशिक्षणाचा लाभ पहिल्यांदाच समितीतील विद्यार्थांबरोबरच इतर विद्यार्थ्यांनाही घेता येणार असल्याचे समितीकडून सांगण्यात आले. डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणाले, "भारताच्या स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करतानाच भारताच्या भविष्याचा उत्सव आपण सगळे साजरा करत आहोत. प्रतापराव यांचे कार्य मोठे असून, त्यांचे नेतृत्व सचोटी आणि सतत समाजाच्या हिताचा विचार करणारे आहे. कितीही दबाव असला तरी निर्णय हा मूल्यांवर आधारित असायला हवा, ही प्रतापरावांची भूमिका जवळून अनुभवली आहे. 'मी'मधून पद, 'आपण'मधून संस्था आणि 'आपण सारे' या भावनेतून राष्ट्र निर्माण होते. प्रतापराव 'आपण सारे'च्या भावनेतून काम करणारे आहेत. विद्यार्थी साहाय्यक समिती हे वसतिगृह नव्हे, तर परिवर्तनाचे केंद्र आहे. इथे केवळ राहण्यासाठी खोली दिली जात नाही, तर आयुष्याच्या यशाची खोली मापण्याची संधी मिळते. केवळ शिक्षण नाही, तर कौशल्ये आणि आत्मविश्वास देणारी ही संस्था आहे."

यावेळी अभिनेता-दिग्दर्शक योगेश देशपांडे यांनी प्रतापराव पवार यांची मुलाखत घेतली. प्रतापराव पवार म्हणाले, "आई-वडिलांनी केलेले संस्कार आणि समाजासाठी योगदान देण्याची दिलेली शिकवण यामुळे आज इथपर्यंत पोहोचू शकलो. पालकांनी मुलांना लहानपणापासून योग्य ते संस्कार घरातून द्यायला हवेत. त्यातूनच नवीन पिढी उत्तम माणूस म्हणून तयार होणार आहे. परदेशात विविध परिषदांमध्ये सहभागी होत असताना चीनसारख्या देशात वर्षापासून 'एआय' वापरत आहोत, तर भारतात का नाही असा विचार माझ्या मनात आला. पण राजकीय दृष्टी, आर्थिक पाठबळ आणि योग्य शिक्षण नसेल तर एआय सारख्या तंत्रज्ञानाचा काही उपयोग होणार नाही. येत्या काळात इतर देशांसोबत पुढे जायचे असेल तर एआयसारख्या तंत्रज्ञानाला पर्याय नाही."

विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता आणि आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन, हुशार व गरजू मुलांना संस्थेत प्रवेश देऊन शैक्षणिक संधी दिली जाते. तसेच केवळ निवास-भोजनाची सुविधा पुरविण्यावरच समाधान न मानता व्यक्तिमत्व विकासाचे मोठे कार्य समिती गेल्या ६२ वर्षांपासून करीत आहे. बदलत्या काळाची गरज लक्षात घेऊन ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांनाही कौशल्याधारित शिक्षण मिळावे या हेतून या केंद्राची स्थापना करण्यात आल्याचे तुषार रंजनकर यांनी प्रास्ताविकात सांगितले.

डिजिटेक इंडियातर्फे विद्यार्थ्यांनी काढलेले तैलचित्र देऊन पवार आणि डॉ. माशेलकर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी समितीला वेळोवेळी मदत करणाऱ्या गजानन पाटील, संतोष करंजे, डिजिटेकचे अजित गटे, गिरीश देसाई, सचिन ईटकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. माजी विद्यार्थिनी व पुणे महापालिका सहायक आयुक्त सुरेखा भणगे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. समितीचे खजिनदार संजय अमृते यांनी आभार मानले.

## केशवराव नांदेडकर यांचे निधन

■ पुणे (दै. संध्या)



सिंहगड रोड वरील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक केशवराव नांदेडकर यांचे अल्पश: आजाराने (दिनांक १७ ऑगस्ट) पुणे येथील एका खाजगी रुग्णालयात निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७९ वर्षे होते.त्यांच्या पश्चात पत्नी,मुलगा,मुलगी,जावई, सुन,नातवंडे असा परिवार आहे.पूर्वांचल भागात अनेक वर्षे प्रचारक राहून संघाचे कार्य केले.भारतीय मजदूर संघ व नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ बँक वर्कर्स शी संलग्न असलेल्या स्टेट बँक वर्कर्स ऑर्गनायझेशन चे संस्थापक सदस्य होते.स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये कार्यरत असतांना भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या ह्या संघटनेचे कार्य सुरू करण्यासाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला.बँकेच्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रदीर्घ लढा देऊन त्यांनी संघटनेचे मोठे काम उभे केले.संघाच्या कामासाठी त्यांनी २००१ साली स्वेच्छानिवृत्ती घेतली.पाच वर्षाहून अधिक काळ पूर्वोत्तर भारतातील सेवा कार्यात सपत्नीक सहभाग घेतला होता. त्यांनी आणीबाणी विरोधी सत्याग्रहातही भाग घेतला होता. मूळचे धुळे येथील केशवराव स्टेट बँक ऑफ इंडिया मधून ३६ वर्षे नोकरी केल्यानंतर होशंगाबाद येथे संघ प्रचारक म्हणून कार्य केले.मिझोरम राज्यात संघ प्रचारक म्हणून कार्यरत असतांना नॅशनल मेडिकोस ऑर्गनायझेशन ची जबाबदारी होती. देवगिरी प्रांताचे प्रांत प्रचार प्रमुख म्हणून त्यांनी काम केले आहे.त्यापूर्वी त्यांनी संघाचे धुळे जिल्हा कार्यवाह म्हणून काम पाहिले. त्यांच्या पत्नी पूर्वांचल मध्ये त्यांचेबरोबर कार्यात असायच्या. निवृत्त स्टेट बँक कर्मचाऱ्यांच्या "स्टेट बँक सांस्कृतिक संवर्धन समिती" द्वारे विविध गटांना त्यांनी कार्यरत ठेवले होते.

## डीपीजीयूमध्ये बी. एस्सी. फॉरेन्सिक सायन्स (ऑनर्स) अभ्यासक्रम सुरू

■ पुणे (दै. संध्या)



डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीच्या ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीने (डीपीजीयू) स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्चअंतर्गत बी.एस्सी. फॉरेन्सिक सायन्स (ऑनर्स) हा नवीन चार वर्षांचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू असून, हा आठ सेमिस्टर आणि १६० क्रेडिट्सचा अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२०च्या चौकटीवर आधारित आहे. या अभ्यासक्रमात वर्गातील अध्यापनासोबत प्रयोगशाळा प्रशिक्षण, गुन्ह्याच्या घटनास्थळाची पाहणी, पुरावे संकलन आणि फॉरेन्सिक दस्तऐवजीकरणावर भर दिला जाणार आहे. फॉरेन्सिक बायोलॉजी, फॉरेन्सिक केमिस्ट्री, फॉरेन्सिक टॉक्सिकॉलॉजी, डिजिटल व सायबर फॉरेन्सिक्स, फिंगरप्रिंट विश्लेषण, बॅलिस्टिक्स, हस्ताक्षर परीक्षण आणि क्राइम सीन इन्व्हेस्टिगेशन यांचा अभ्यास विद्यार्थ्यांना करता येणार आहे. यासोबत कायदेविषयक ज्ञान आणि अहवाल लेखनाचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे.

याबाबत डीपीजीयूचे प्र-कुलपती डॉ. सोमनाथ पी. पाटील म्हणाले, “फॉरेन्सिक सायन्स हे वैज्ञानिक काटेकोरपणा आणि समाजसेवेच्या संगमावर आधारित क्षेत्र आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवी न देता न्यायव्यवस्थेत प्रभावी योगदान देता यावे, यासाठी आवश्यक प्रयोगशाळा प्रशिक्षण आणि कायदेविषयक ज्ञान देणे हा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे.” मान्यताप्राप्त मंडळातून बारावीमध्ये PCB किंवा PCMB शाखेत किमान ४५ टक्के गुण मिळवलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र आहेत. दोन सेमिस्टर पूर्ण केल्यावर प्रमाणपत्र, चार सेमिस्टरनंतर डिप्लोमा, सहा सेमिस्टरनंतर बी.एस्सी. पदवी, तर आठ सेमिस्टर आणि संशोधन प्रबंध पूर्ण केल्यावर बी.एस्सी. (ऑनर्स) पदवी मिळणार आहे. पदवीधरांना फॉरेन्सिक सायंटिस्ट, क्राइम सीन इन्व्हेस्टिगेटर, फॉरेन्सिक टॉक्सिकॉलॉजिस्ट, फॉरेन्सिक लॅब टेक्निशियन, डिजिटल फॉरेन्सिक्स विश्लेषक, मेडिको-लीगल तज्ज्ञ तसेच संशोधन क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध होतील. पुढील शिक्षणासाठी एम.एस्सी. आणि पीएच.डी.चे पर्यायही उपलब्ध आहेत.

डीपीजीयू स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्चला NIRF क्रमवारीत ३५वे स्थान असून NAAC A++ मानांकन प्राप्त आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी spr.dpgu.edu.in येथे अर्ज करावा किंवा ९११ २२२२ ५०३ / ९१४ ६९९९ ५२२ / ५१५ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

## जलसंधारण दिनानिमित्त पुणे जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन

२१ ऑगस्ट रोजी ‘जलसंधारण जनजागृती पदयात्रा’; पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

■ पुणे (दै. संध्या)

पावसाचे पाणी अडवणे, ते जमिनीत मुरवणे, मातीचे संवर्धन करणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत जनजागृती करण्यासाठी पुणे जिल्ह्यात १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत ‘जलसंधारण सप्ताह’ तसेच १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत ‘जलसंधारण अभियान’ राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यात विविध जनजागृती, शैक्षणिक आणि प्रत्यक्ष जलसंधारणाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

२१ ऑगस्ट रोजी ‘जलसंधारण दिना’निमित्त ‘महा वॉकेथॉन–जलासाठी चालूया’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. ‘माती वाचवा, पाणी वाचवा, भविष्य सुरक्षित करा’ हा या उपक्रमाचा मुख्य संदेश असून ‘पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा’ या संकल्पनेतून नागरिकांमध्ये जलसंधारणाबाबत जागृती करण्यात येणार आहे. माती आणि पाण्याचे महत्त्व सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित या उपक्रमात पुणे शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

युवक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शासकीय अधिकारी-कर्मचारी, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, उद्योजक तसेच जलसंधारण क्षेत्रात कार्यरत विविध घटकांनी या उपक्रमात सहभागी होऊन ‘पाणी वाचवा, भविष्यासाठी पाणी जपा’ हा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या पदयात्रेत सहभागी नागरिकांना जलसंधारणाची शपथ देण्यात येणार आहे. जलसंधारण हा केवळ शासनाचा उपक्रम न राहता त्याला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

जलसंधारणाचा संदेश युवकांपर्यंत आधुनिक माध्यमातून पोहोचविण्यासाठी ‘माती व पाणी संवर्धनावरील लघुचित्रफीत’ स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. माती संवर्धन, पाणी बचत, पावसाचे पाणी साठवण, शेततळे, बंधारे, पाणलोट विकास, वृक्षारोपण तसेच जलसंधारणाच्या यशस्वी कामांवर आधारित सर्जनशील लघुचित्रफीत तयार करण्यासाठी युवकांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

### शाळा-महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम

जलसंधारण सप्ताहाच्या निमित्ताने जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, चित्रकला, भित्तीचित्र, वादविवाद आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच ‘एक शाळा–एक शोषखड्डा’ हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना पाणी बचतीचे महत्त्व पटवून देतानाच त्यांचा ‘जलमित्र’ आणि ‘जलदूत’ म्हणून सहभाग वाढविण्यात येणार आहे.

## भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी शश्रुती नकाडे आघाडीवर

■ पुणे (दै. संध्या)




पुण्याच्या बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात १६ ऑगस्ट रोजी 'इंडियन ट्रायथलॉन फेडरेशन मिनी ऑरेंज नॅशनल अँड एज-ग्रुप ट्रायथलॉन चॅम्पियनशिप'चा समारोप झाला. या स्पर्धेत देशभरातून विक्रमी ४४९ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. पॅरा-ट्रायथलॉन, किड्स-ट्रायथलॉन, सब-ज्युनियर, ज्युनियर, अंडर २३, वरिष्ठ आणि वयोगट अशा विविध श्रेणींमध्ये आपली कौशल्ये सादर केली.

१४ ते १६ ऑगस्ट दरम्यान आयोजित या स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरील सन्मान आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळवण्यासाठी खेळाडूंनी जोरदार चुरस निर्माण केली. पुण्यात सुवर्णपदक आणि 'एलए २०२८'वर लक्ष देत पॅरा-ट्रायथलॉनमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी शश्रुती नकाडे आघाडीवर आहे. तरुण खेळाडू, महिला आणि पॅरा-ट्रायथलीट्स यांच्या वाढत्या सहभागामुळे ही विक्रमी उपस्थिती दिसून आली. एकूण प्रवेशिकांपैकी २४.५ टक्के महिला होत्या, तर जवळपास प्रत्येक तीन स्पर्धकांपैकी एक जण ज्युनियर, सब-ज्युनियर किंवा किड्स-ट्रायथलॉन गटातील होता. यावरून या खेळात येणाऱ्या आणि राष्ट्रीय स्पर्धांच्या रचनेतून प्रगती करणाऱ्या युवा खेळाडूंचा विस्तारणारा पाया दिसून येतो.

# रस्ते व ड्रेनेज दुरुस्ती कामांना गती देण्याच्या महापौर यांच्या सूचना

■ पुणे (दै. संध्या)



पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील रस्ते, ड्रेनेज व्यवस्था आणि मूलभूत नागरी सुविधांच्या समस्यांची गंभीर दखल घेत पुणे महानगरपालिकेच्या महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी संबंधित विभागांना रस्ते व ड्रेनेजची कामे तातडीने हाती घेऊन त्यांना गती देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

नवीन समाविष्ट गावांमध्ये अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था खराब असून काही ठिकाणी रस्ते अपूर्ण आहेत. तसेच ड्रेनेजची अपुरी व्यवस्था, पावसाळ्यात रस्त्यांवर साचणारे पाणी, चिखल आणि वाहतुकीस निर्माण होणारे अडथळे यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेबरोबरच दैनंदिन वाहतुकीचा प्रश्नही गंभीर बनत आहे. या पार्श्वभूमीवर म्हाळुंगे गावासह सर्व नवीन समाविष्ट गावांतील प्रमुख रस्ते, अंतर्गत रस्ते तसेच ड्रेनेज व्यवस्थेची स्थळनिहाय पाहणी करून आवश्यक दुरुस्तीची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत, अशा स्पष्ट सूचना महापौर मंजुषाताई नागपुरे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. “नवीन समाविष्ट गावांतील नागरिकांनाही पुणे शहरातील इतर भागांप्रमाणे दर्जेदार मूलभूत नागरी सुविधा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. रस्ते आणि ड्रेनेजसारख्या अत्यावश्यक सुविधांच्या कामांमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून कामांना गती द्यावी,” असे महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी सांगितले.

तसेच संबंधित विभागांनी प्रत्येक नवीन समाविष्ट गावातील रस्ते व ड्रेनेजच्या समस्यांचे स्थळनिहाय सर्वेक्षण करून कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करावा, आवश्यक निधी व मनुष्यबळाचे नियोजन करावे आणि पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तातडीच्या कामांना प्रथम प्राधान्य द्यावे, असेही महापौरांनी निर्देशित केले आहे.

रस्त्यांची दुरुस्ती करताना केवळ तात्पुरती डागडुजी न करता दर्जेदार व टिकाऊ कामे करण्यात यावीत, तसेच ड्रेनेज व्यवस्थेतील अडथळे दूर करून पावसाचे पाणी साचणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, असेही महापौरांनी स्पष्ट केले.

नवीन समाविष्ट गावांचा नियोजनबद्ध आणि सर्वसमावेशक विकास हा महापालिकेच्या प्राधान्यक्रमाचा भाग असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तातडीने सोडवण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने आणि वेळबद्ध पद्धतीने काम करावे, अशी भूमिका महापौरांनी व्यक्त केली.

# देवाभाऊ, आदिवासी मंत्र्याचा राजीनामा घ्यावा : सुनील झळके

## जपतलाई सर्पदंश प्रकरण: सचिव, आयुक्त, प्रकल्प अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी

■ भिवंडी /मुंबई (दै. संध्या)

जपतलाई अनुदानित आश्रमशाळेतील तीन विद्यार्थीनीच्या मृत्यू प्रकरणी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांचा राजीनामा घेऊन आदिवासी विकास विभागाचे सचिव, आयुक्त,प्रकल्प अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ट्रायबल फोरम कोकण विभागाचे कार्याध्यक्ष सुनील झळके यांनी केली आहे.



गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील अनुदानित आश्रम शाळेत दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे २.०० ते २.३० वाजेच्या सुमारास झोपेत असलेल्या ६ विद्यार्थीनींना विषारी सापाने दंश केल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. या दुर्दैवी घटनेत ३ निष्पाप विद्यार्थीनींचा नाहक बळी गेला आहे.

राज्यात सन २००२ ते २०१२ या दहा वर्षात ७९३ आदिवासी विद्यार्थ्यांचा आश्रमशाळांमध्ये मृत्यू झाला आहे.या मृत्यूबाबत उच्च न्यायालय मुंबई येथे सामाजिक कार्यकर्ते रविंद्र तळपे यांनी जनहित याचिका क्र. ६९/२०१३ दाखल केली होती.या याचिकेवर उच्च न्यायालयाने १८ जून २०१४ रोजी महत्वपूर्ण निर्देश दिले होते.या निर्देशानुसार

राज्यशासनाने ३० मे २०१६ रोजी डॉ. सुभाष साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करीत आश्रमशाळांमधील सुरक्षा उपाययोजना सुचविण्याचे निर्देश दिले होते.त्यानुसार समितीने १९ ऑक्टोबर २०१६ रोजी आश्रमशाळांमधील मृत्यू रोखण्यासाठीचा अहवाल शासनाला दिला आहे.तसेच आश्रमशाळा संहिता आहे. यानुसार आदिवासी विकास विभागाने प्रभावी अंमलबजावणी केली असती तर जपतलाई येथील घटना घडली नसती.

जपतलाई येथील घटना केवळ एक अपघात नसून आश्रमशाळा प्रशासनासह प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास आयुक्त, आदिवासी विकास विभागाचे सचिव,आदिवासी मंत्री यांचा घोर निष्काळजीपणा व दिरंगाईचा परिणाम आहे. आदिवासी विकास विभागाची संपूर्ण यंत्रणा व व्यवस्थाही तेवढीच जबाबदार आहे. आश्रमशाळा तपासणीत दिरंगाई अथवा खोटे तपासणी अहवाल सादर करणारे प्रकल्प अधिकारी, नियमांची अंमलबजावणी न करता खोटे तपासणी अहवाल स्विकारुन प्रकल्प अधिका-यांना पाठीशी घालणारे आदिवासी विकास विभागाचे आयुक्त,आणि उच्च न्यायालयाचे निर्देश, शिफारशींची अंमलबजावणी, आश्रमशाळा संहिता व शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणारे आदिवासी विकास विभागाचे सचिव यांचेवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### कोट्यावधीचा खर्च, सुविधा नाहीच

राज्यात आदिवासी विकास विभागा अंतर्गत १ हजार ५३ आश्रमशाळा आहेत.यापैकी ४९७ आश्रमशाळा शासकीय असून ५५६ अनुदानित आश्रमशाळा आहेत. गेल्या पाच वर्षात राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांवर तब्बल ६ हजार २१८ कोटींचा निधी खर्च होऊनही मुलभूत सुविधा व सुरक्षा नाहीत. कोट्यावधी रुपये जातात कुठे? असा प्रश्न ट्रायबल फोरमने उपस्थित केला आहे.

### दोन वर्षात ४५६ मृत्यू

राज्यात शासकीय व अनुदानित आश्रमशाळांत साडेचार लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहे.गत दोन वर्षात शासकीय व अनुदानित आश्रमशाळांत तब्बल ४५६ आदिवासी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे.आश्रम शाळांतील आदिवासी मुले सुरक्षित नाहीत.जपतलाई येथील तीन चिमुकल्या मुलींचा बळी व्यवस्था व यंत्रणेनेच घेतल्याचा गंभीर आरोप ट्रायबल फोरमने निवेदनातून केला आहे.

# अमितेश कुमार यांचा मान्यवरांकडून विशेष सत्कार!



■ पुणे (दै. संध्या)

पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना त्यांच्या उल्लेखनीय आणि कर्तव्यदक्ष सेवेबद्दल केंद्रीय गृह मंत्रालयाकडून मानाचे 'अतिउत्कृष्ट सेवा पदक' जाहीर झाले आहे. या गौरवपूर्ण कामगिरीबद्दल पुणे शहरातील विविध क्षेत्रांतील प्रमुख लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने पोलीस आयुक्तांचा पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. दरम्यान यावेळी उत्कृष्ट सेवेबद्दल सहपोलिस आयुक्त संजय दराडे यांचाही शिष्टमंडळाने विशेष सत्कार केला. पुणे पोलीस आयुक्तपदाची सूत्रे हातात घेतल्यापासून अमितेश कुमार यांनी शहरातील गुन्हेगारी नियंत्रण, अवैध धंद्यांवरील धडक कारवाई आणि सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण या त्रिसूत्रीवर विशेष भर दिला आहे. त्यांच्या याच गतिमान आणि धाडसी कार्यपद्धतीमुळे पुणे शहर आणि पोलीस दलाचा लौकिक अत्यंत वाढल्याची भावना या सत्कार प्रसंगी मान्यवरांनी व्यक्त केली. या विशेष सत्कार प्रसंगी पुणे शहराचे माजी नगरसेवक अय्युब शेख, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, शिवसेना नेते अजय भोसले, शिक्षण मंडळाचे माजी सदस्य बाळासाहेब जानराव, रिपब्लिकन सोशालिस्ट पक्षाचे राहुल डंबाळे, शिवसेनेचे मिलिंद आहिरे तसेच सामाजिक कार्यकर्ते आबिद सय्यद आणि इतर सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी आयुक्त अमितेश कुमार यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दमदार कंटेंटसह मराठी झी5ची आघाडी अधिक मजबूत

■ मुंबई (दै. संध्या)

प्रादेशिक आशयाला देशभरात वाढती पसंती मिळत असताना मराठी कथांमधील वैविध्य, सांस्कृतिक समृद्धी आणि आशयाची ताकद यावर भर देत मराठी झी5ने आपल्या दुसऱ्या वर्षासाठी दमदार आणि वैविध्यपूर्ण मनोरंजनाची घोषणा केली आहे. पहिल्या वर्षात मिळालेल्या प्रेक्षकांच्या प्रतिसादानंतर लोकप्रिय मालिकांचे नवे भाग, नवीन मूळ मालिका, चित्रपट, विनोदी कार्यक्रम, प्रीमियम आशय आणि थेट क्रीडा स्पर्धांचा समावेश असलेले विस्तृत मनोरंजनविश्व प्रेक्षकांसमोर आणण्यात येणार आहे. मराठी प्रेक्षकांसाठी वर्षभर दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण कथा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आघाडीच्या निर्मिती संस्थांसोबत सहकार्य करण्यात आले आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंत कलाकार आणि निर्मात्यांच्या कलाकृतींसोबतच नव्या प्रतिभेलाही व्यासपीठ देण्याचा प्रयत्न या नव्या आशयातून दिसून येतो. मराठी झी5च्या लोकप्रिय मालिकांपैकी दोन गाजलेल्या मालिकांचे नवे भाग पुन्हा




प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. बहावा एंटरटेनमेंटची 'हे काय नवीन?' ही मालिका दुसऱ्या पर्वासह परतणार असून, उमेश कामत आणि प्रिया बापट ही लोकप्रिय जोडी पुन्हा एकदा एकत्र दिसणार आहे. सिनेमास्टर्स प्रॉडक्शनची 'देवखेळ' ही मालिकाही दुसऱ्या पर्वासह प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यामध्ये अंकुश चौधरी आणि प्राजक्ता माळी ही लोकप्रिय जोडी पुन्हा एकत्र दिसणार आहे. नव्या आशयामध्ये भरत जाधव, शर्वरी जमेनीस, पुष्कर श्रोत्री आणि शिवानी रांगोळे यांच्या भूमिका असलेली 'कोण यशवंत पानसरे?' ही मालिका विशेष आकर्षण ठरणार आहे. याशिवाय कोक्लिको पिक्चर्सची '११२' ही मालिकाही सादर करण्यात येणार आहे. निखिल महाजन यांनी निर्मिती केलेल्या या मालिकेचे दिग्दर्शन जीविषा काळे आणि रोहित सातपुते यांनी केले आहे. विविध विषय, प्रभावी कथानक आणि नव्या कलाकारांना संधी देण्याचा प्रयत्न या मालिकांमधून करण्यात आला आहे. मालिकांसोबतच विविध प्रकारच्या चित्रपटांचाही मोठा संग्रह प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर झी5वर येणाऱ्या चित्रपटांमध्ये झी स्टुडिओजच्या 'तुंबाडची मंजुळा'चा समावेश आहे.

# रविंद्र चव्हाण यांच्याकडून प्रत्यक्ष बैठकीत थेट कानपिचक्या

■ नागपूर (दै. संध्या)

नागपूर पदवीधर मतदारसंघातील विजयासाठी नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील एकूण अंदाजे बारा लक्ष सुशिक्षित पदवीधर मतदारांपैकी किमान पन्नास हजार नवे मतदार नोंदणी करून घ्यावे आणि सोशल मीडियावर तसेच नागरिकांच्या प्रत्यक्ष गाठीभेटीत सक्रिय होत केंद्र तसेच राज्य सरकारने केलेल्या कामांचे प्रमोशन करावे अशा सूचना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेत्यांना दिल्या. नागपुरात मंचावर राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, भाजप आमदार प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, परिणय फुके आणि शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी असताना या कानपिचक्या त्यांनी दिल्या आहेत. नागपूर पदवीधर मतदारसंघाची निवडणूक अवघ्या चार महिन्यांवर येऊन ठेपली असताना आतापासूनच भाजपने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. गेल्यावेळी प्रथमच भाजपला पराभवाचा सामना करावा लागला होता त्याची आठवण करून देत प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पूर्व



विदर्भात दोन दिवसांत सहा बैठका घेतल्या. नागपूर च्या एअरपोर्ट बँकवेट हॉल येथील आपल्या दौऱ्याच्या अंतिम बैठकीत नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आणि वर्धा येथील प्रमुख भाजप पदाधिकारी, नगरसेवक आणि नेत्यांच्या उपस्थितीत भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वात आधी आपल्याला ही निवडणूक जिंकायची आहे का..आपली तशी इच्छा आहे का.. असा सवाल टाकत रवींद्र चव्हाण यांनी सर्व उपस्थितांची विकेट घेतली.डिजिटल प्लॅटफॉर्म वर आपल्यापैकी किती जणांची सक्रिय उपस्थिती असते असे पुढे सवाल करत त्यांनी सर्व उपस्थितांना अंतर्मुख केले..आणि आपण सोशल मीडियावर कमी पडतो, असे सरळ स्पष्ट विधान करून कानपिचक्या दिल्या.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की नागपूर शहर, ग्रामीण आणि वर्धा मिळून सुमारे अंदाजे सत्तर लाख लोकसंख्या आहे. यापैकी सुशिक्षित पदवीधर अंदाजे 12 लाख असावेत असा अंदाज आहे. आपली राज्यात दीड लाखांपेक्षा जास्त सक्रिय सदस्य असलेली पार्टी. इथल्या 80 टक्के लोकांनी डिजिटल प्लॅटफॉर्म वर सक्रिय असल्याचे सांगितले आहे. पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, राज्याचे मुख्यमंत्री आणि राज्याचे मंत्री यांनी घेतलेले निर्णय पाहून त्यासाठी डिझाइन बनवून तुमचे नाव, तुमचे पद यांचा उल्लेख करून आपल्या पेजवर टाकत राहिलो आणि शेअर करत राहिलो तर महाराष्ट्रात एक चांगले वातावरण तयार करण्यात यशस्वी ठरू. आपल्यापैकी सोशल मिडिया क्षेत्रात तज्ज्ञ कोण आहे. त्याचे ऐकाल का. हे जर केलं तर त्याचे परिणाम लवकर दिसेल. केंद्र आणि राज्य सरकार ची कामे जनते पर्यंत पोहोचविणे, यावर भर दिला पाहिजे. काही शक्ती अजेंडा घेऊन उतरतील. मग आपण काय करावं? तुमच्यापैकी नगरसेवक किती आहेत इथे. फक्त नगरसेवकच नाही, बाकी बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख आदी मुख्य कार्यकर्त्यांनी लक्ष दिले पाहिजे. आपण जेव्हा लोकांच्या भेटी घेतो. तेव्हा ते आपल्या समस्या सांगतात. त्या ऐकल्याच पाहिजे. पण त्याच वेळी आपण VOCAL झालो पाहिजे. आपली भाजप कार्यकर्ते म्हणून वेगळी ओळख. आपण ठरवायचे की अशावेळी त्यांना काय सांगावे? आपण राजकारणात कशासाठी आहोत. सत्तेसाठी नव्हे तर राष्ट्राचे हित साधण्यासाठी आहोत. गेल्या काही काळात आपण प्रत्येक निवडणुका जिंकत आहोत. आपला जाहीरनामा अजेंडा हा अटलजी पासून मोदीजी पर्यंत राष्ट्रहिताचाच तोच अजेंडा आहे. वेगळे काही नाही. राष्ट्राचे हित आणि विकास हाच अजेंडा. पश्चिम बंगाल ची निवडणूक जिंकल्याने देशाचे काय भले झाले ते आपल्याला सर्वांना माहित असून आपण बोलत नाही.

# डीक्लासिफाइड : ऑपरेशन सिंदूर; भारताच्या ८८ तासांच्या प्रत्युत्तराची पडद्यामागची कहाणी

### सर्वोच्च लष्करी व राष्ट्रीय सुरक्षा नेतृत्व पहिल्यांदाच एकाच माहितीपट मालिकेत

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

भारताच्या अलीकडील लष्करी इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण अध्याय असलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ची पडद्यामागील कहाणी आता प्रेक्षकांसमोर आली आहे. डिस्कव्हरीने 'डीक्लासिफाइड: ऑपरेशन सिंदूर' या दोन भागांच्या माहितीपट मालिकेत भारताच्या वरिष्ठ लष्करी व राष्ट्रीय सुरक्षा नेतृत्वापासून ते कारवाईचे नेतृत्व करणारे कमांडर आणि आघाडीवरील जवानांपर्यंतचा प्रत्यक्ष अनुभव मांडला आहे. १५ ऑगस्ट रोजी डिस्कव्हरीवर विशेष प्रीमियर झाल्यानंतर ही मालिका डिस्कव्हरी+ वर प्रवाहासाठी उपलब्ध झाली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने आखलेल्या आणि अवघ्या ८८ तासांच्या कालावधीत निर्णायक व नियोजित प्रत्युत्तर देणाऱ्या कारवाईचा प्रवास या माहितीपटातून उलगडण्यात आला आहे. कारवाईमागील नियोजन, गुप्तचर माहितीचे संकलन, लक्ष्य निश्चिती, टेहळणी, सराव-सत्रे तसेच विविध संभाव्य परिस्थितींचा विचार करून केलेली तयारी याची माहिती पहिल्या भागात देण्यात आली आहे. राष्ट्रीय सुरक्षा



सल्लागार अजित डोवाल यांनी ऑपरेशन सिंदूरनंतरच्या पहिल्याच मुलाखतीत या माहितीपटात कारवाईचे उद्दिष्ट स्पष्ट केले आहे. पहलगाम हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवादी तळांचा विध्वंस करणे हे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. भारताचा संयम किंवा उदारपणा ही कमजोरी समजू नये आणि गरज पडल्यास भारत निर्णायक प्रत्युत्तर देऊ शकतो, असा स्पष्ट संदेशही त्यांनी दिला.माहितीपटाच्या दुसऱ्या भागात नियोजनातून प्रत्यक्ष कारवाईपर्यंतचा थरारक प्रवास दाखवण्यात आला आहे. हल्ल्यांपूर्वीचे तणावपूर्ण क्षण, तिन्ही संरक्षण दलांमधील समन्वय, प्रत्यक्ष कारवाईदरम्यान घेतलेले निर्णय आणि मिशन पूर्ण झाल्याची खात्री होईपर्यंतची प्रक्रिया यांचा प्रत्यक्ष सहभागींच्या अनुभवातून वेध घेण्यात आला आहे. माजी चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान यांनीही या माहितीपटातून ऑपरेशनमागील धोरणात्मक विचार मांडला. पहलगाममधील हल्ल्याने देशाच्या मनावर खोलवर परिणाम झाल्याचे सांगताना, भारत अशा धमक्यांपुढे झुकणार नाही, हा निर्धार होता, असे त्यांनी स्पष्ट केले. संघर्ष कधी सुरू करायचा याइतकेच तो कधी थांबवायचा हे जाणणे महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. कारवाईनंतर पत्रकार परिषदेत सशस्त्र दलांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला अधिकाऱ्यांचाही या माहितीपटात विशेष उल्लेख करण्यात आला आहे. दहशतवादी हल्ल्यांनी भारतातील महिलांचा आत्मविश्वास डगमगणार नाही आणि देशाची सामाजिक व भावनिक ताकद कायम राहील, असा संदेश या माध्यमातून देण्यात आल्याचे जनरल चौहान यांनी सांगितले. या मालिकेत ऑपरेशनशी थेट संबंधित व्यक्तींच्या अनुभवांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. घटना, निर्णय आणि त्यामागील विचारप्रक्रिया प्रत्यक्ष सहभागींच्या कथनातून समोर येते. त्यासोबतच संरक्षण तज्ज्ञांचे विश्लेषण आणि व्यापक राष्ट्रीय सुरक्षा संदर्भ यामुळे ऑपरेशन सिंदूरची अधिक व्यापक पार्श्वभूमी प्रेक्षकांसमोर उभी राहते. वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीचे भारत व दक्षिण आशियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अर्जुन नोहवार यांनी ही मालिका भारताच्या अलीकडील लष्करी इतिहासातील महत्त्वाच्या अध्यायाशी प्रेक्षकांना जोडणारी असल्याचे सांगितले. प्रत्यक्ष कारवाईचे नेतृत्व करणाऱ्या आणि ती अनुभवलेल्या व्यक्तींच्या आवाजातून ही कथा सांगण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या माहितीपटाचे सह-दिग्दर्शन प्रभू आसगांवकर आणि मनिका बेरी यांनी केले आहे. ऑपरेशनची कथा प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने मांडण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.

# ५९ प्रकल्प राज्यात प्रस्तावित

■ जुन्नर (दै. संध्या)

माळशेज भोरांडे प्रकल्पासारखे एकूण 59 प्रकल्प आगामी काळात राज्यात प्रस्तावित आहेत. या प्रकल्पांमधून ऐंशी हजार मेगा वॅट एवढी वीज निर्मितीची क्षमता आहे. आगामी 2030 मध्ये महाराष्ट्राला एवढ्या ऊर्जेची गरज देखील भासणार नसल्याने हे प्रकल्प सह्याद्रीवर लादण्याची गरज काय असा सवाल शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ अमोल कोल्हे यांनी केला. जुन्नर येथे अंजनावळे येथे प्रस्तावित असलेल्या अदानी जलविद्युत प्रकल्पाच्या अनुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. कोल्हे यांनी हा सवाल उपस्थित केला आहे.

## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष - पाणीपुरवठा विभाग

निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. १८/०८/२०२६ १४:३० दुपारी ते २७/०८/२०२६ दुपारी १४:३० दुपारी पर्यंत

स्विकृती दिनांक : दि. १८/०८/२०२६ १४:३० दुपारी ते २७/०८/२०२६ दुपारी १४:३० दुपारी पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २८/०८/२०२६ १५:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२१/२०२६ | पाणी पुरवठा | पुणे मनपाच्या पाणीपुरवठा खात्याकडील विविध जलकेंद्रासाठी पॉलीॅल्युमिनियम क्लोराईड पावडर (IS१५५७३:२००५/२०१८) नुसार पुरविणे. (मेक-ग्रासिम/GACL/ आर्कील/मे. आंध्रा शुगर्स लिमिटेड) | रू. ६०७९/- | रू. ८१६७५००/- | रू. ८१६७५/- | १२ | संदिप सपकाळे ९६८९९३१०६८ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
अभिजित साठे
कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/५८७ दि. १७/०८/२०२६

## महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

इ-निविदा सूचना
क्र.ना.औ.वि.कें/२०२६-२७/२०

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) / इसारा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | ३००००७०८१४ / बीएम | संच क्र. ४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान बॉयलर आवरण, पेन्टहाऊस हेडर, एचआरएच आणि सीआरएच लाइन्सला जीआय आणि रिब्ड शीट क्लेडिंगसह थर्मल इन्सुलेशन काढणे आणि बसवणे. | ५०,००,५४५/- / ५३,५१०/- |
| २. | ३००००७११०४ / बीएम | २१० मेगावॅट बॉयलरसाठी बीटी मेकॅनिझम स्पेअर्सची खरेदी. | ३,५६,०२०/- / ७,१००/- |
| ३. | ३००००७१२२६ / टिएम | एअर कॉम्प्रेसर काढून हलवणे आणि त्यानंतर त्याची पुनर्स्थापना करण्याचे काम. | ६,३६,०००/- / ९,९००/- |
| ४. | ३००००७१०८७ / टिएम | संच क्र. ३/४/५ येथे GS वॉटर हेडर (पाईप आकार ६०० ते ७५०NB) ची सामग्रीसह दुरूस्ती/ बदलीसाठी कामाचा करार (आवश्यकतेनुसार). | २७,४८,८१९/- / ३०,९९०/- |
| ५. | ३००००७१२२८ / बीएम | संच क्र. ४ च्या COH दरम्यान बॉयलर आणि त्याच्याशी संबंधीत संरचना, ज्यामधे बॉयलर पेंटहाऊस, डॉगहाऊस आणि कॅटहाऊस यांच्या बाहय पृष्ठभागांची संपूर्ण साफसफाई आणि वॉशिंग करण्याचे काम. | ५,८०,०००/- / ९,३००/- |
| ६. | ३००००७१२२९ / बीएम | संच क्र. ३,४,५ ला फोर्सड् शटडाऊन आणि आर एस डी आउटेज दरम्यान बॉयलर ट्यूब लीकेजेस आणि इतर संबंधित कामासाठी वार्षिक कंत्राट (आवश्यकतेनुसार) | १.१४,६१,४६३/- / १,१८,१५०/- |
| ७. | ३००००७१२३१ / डब्ल्युटीपी | कोल सॅम्पलर ऑगरचे ऑपरेशन व सर्व्हिसिंग करण्याचे कंत्राट. | १८,५५,३५०/- / २२,१००/- |
| ८. | ३००००७१२७६ / टेस्टिंग | संच क्र. ३,४,५ फायर अलार्म सिस्टीम च्या देखभालीचे वार्षिक कंत्राट. | २,२५,०२८/- / ५,७५०/- |
| ९. | ३००००७१२९३ / आयटी | सर्व्हर, डेस्कटॉप, संगणक, प्रिंटर आणि नेटवर्किंग उपकरणांसाठी वार्षिक देखभाल करार. | १२,८५,०१६/- / १६,३५०/- |
| १०. | ३००००७१२०४ / सिव्हिल | एकलहरे कॉलनी परिसरातील दैनंदिन गवंडी कामांसाठी वार्षिक कंत्राट | ११,२१,३११/- / १४,७२०/- |
| ११. | ३००००७१३१३ / सिव्हिल | डब्ल्युटीपी १ मधुन सामनगाव, कोटमगाव, हिंगणवेढे या गावांना दारणा नदीचे पाणी पुरविण्यासाठी पंप व व्हॉल्व्ह चालविण्याचे द्विवार्षिक देखभाल कंत्राट | ८,०७,४२२/- / ११,६००/- |
| १२. | ३००००७१३१२ / सिव्हिल | जेसीबी मशीनच्या साहाय्याने डर्क इंडिया ते बॅरेज आणि माले वस्ती, वाळुवाट रस्ता, आभाळे वस्तीपासुन बॅरेजपर्यंत विविध नाल्यांची स्वच्छता, साफसफाई आणि निर्जंतुकीकरण. | ६,४३,७१७/- / ९,९५०/- |
| १३. | ३००००७१३१० / ओडीपी | संच क्र. ४ वार्षिक दुरूस्ती दरम्यान एमएस फास्टनर्सची खरेदी | ६,३५,२००/- / ९,९००/- |
| १४. | ३००००७१३९३ / बीएम | संच क्र. ३,४,५ बॉयलरच्या आयडी फॅन्स आणि इतर संबंधित कामासाठी वार्षिक कामाचा करार | १८,२२,७४६/- / २१,७३०/- |
| १५. | ३००००७१२८६ / बीएम | संच क्र. ४ कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान बॉयलरची जी.एस. लाईन व्हॉल्व सर्व्हिसिंग तसेच इकॉनॉमायझर आऊटलेटपासुन एपीएच इनलेटपर्यंत फ्लु गॅस डक्ट आणि ९ मीटरपेक्षा जास्त लेवलवरील हॉट व कोल्ड एअर डक्टचे दुरूस्तीचे काम. | ८,२१,०४७/- / ११,७१०/- |

नविन विक्रेते/ नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी. अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक
औ.वि.केंद्र, एकलहरे

## थोडक्यात पण महत्वाचे



### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने ८० वा स्वातंत्र्य दिन साजरा

**पिंपरी : दैनिक संध्या**

शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने मध्यवर्ती कार्यालय, खराळवाडी, पिंपरी येथे सकाळी ०८:३० वाजता साजरा करण्यात आला. शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. शहराध्यक्ष आपल्या भाषणात म्हणाले की, भारत देश हा सर्वात मोठा शेती प्रधान व लोकशाही मानणारा देश आहे. भारत देशात अनेक धर्माचे, अनेक भाषा बोलणारे लोक एकत्र राहतात व एकमेकांच्या संस्कृतीचा आदर करतात. आपण सर्वांनी देशासाठी बलीदान देणाऱ्या सैनिकांना व विविध क्षेत्रात देशासाठी योगदान देण्याऱ्या महामानवाचे नेहमी स्मरण करावे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने सर्वांना स्वातंत्र्य दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी शहर कार्यकारिणीमध्ये भोसरी विधानसभा कार्याध्यक्ष अकबर मुल्ला, सरचिटणीस पदी राजेंद्र पवार, अर्बन सेल अध्यक्ष सचिन गायकवाड, जेष्ठ नागरिक सेल अध्यक्ष अविनाश कुलकर्णी, तर सेवादल सेल शहर कार्यकारिणी मध्ये चिंचवड विधानसभा अध्यक्ष पदी महेश माने, शहर राष्ट्रवादी सेवादल उपाध्यक्ष राजू भीमा लोणके, दीपक कार्की, गणेश ताम्हाणे, राम खरात, तर भोसरी विधानसभा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर रघुनाथ भालेकर, आकाश प्रदीप शेंडे, अमोल धनाजी कदम, सरचिटणीस धनराज अवधूत सूर्यवंशी, चिटणीस अमित नथु थोरात यांना नियुक्त पत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन सेवादल अध्यक्ष ज्ञानेश्वर उर्फ माऊली मोरे, भोसरी विधानसभा सेवादल अध्यक्ष प्रवीण पिंजन यांनी केले. सदर कार्यक्रमास शहराध्यक्ष योगेश बहल, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, मा. स्थायी समिती अध्यक्षा सीमा सावळे, कार्याध्यक्ष फजल शेख, विजय लोखंडे, सारंग कामतेकर, चिंचवड विधानसभा संघटक सतीश दरेकर, युवक अध्यक्ष शेखर काटे, युवती अध्यक्ष तथा नगरसेविका वर्षा जगताप, नगरसेवक विक्रांत लांडे, राजेंद्र जगताप, नगरसेविका निकिता कदम, सविता आसवानी, विद्यार्थी अध्यक्ष अथर्व कोकणे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष कैलास बारणे, प्रदेश ओबीसी कार्याध्यक्ष ॲड.सचिन औटे, प्रदेश उपाध्यक्ष ॲड.गोरक्ष लोखंडे, ज्ञानेश्वर कांबळे, शेरबहादूर उर्फ मायला खत्री, महीला कार्याध्यक्ष कविता खराडे, चिंचवड विधानसभा अध्यक्षा संगीता कोकणे, युवक कार्याध्यक्ष तुषार ताम्हाणे, विशाल काळभोर, दीपक साकोरे, रवींद्र ओव्हाळ, युवराज पवार, श्रीकांत कदम, युसुफ कुरेशी, संग्राम चव्हाण, प्रशांत महाजन, दत्तात्रय जगताप, अरुण पवार, शक्रुल्ला पठाण, संपत पाचुंदकर, तुकाराम बजबळकर, प्रवीण गव्हाणे, महेश झपके, बाळासाहेब पिल्लेवार, अंकुश दिघे, नवनाथ डफळ, काळुराम खेडकर, गोरोबा गुजर, लहू तोरणे, रवींद्र सोनवणे, बापू सोनवणे, जहीर उर्फ छोटू खान, महेश किर्वे, उदय कुलकर्णी, महेश माने, प्रा. संतोष भांगे, शहाजी आतकर, भाग्यश्री मस्के, नीलम कदम, देवी थोरात, क्षमा सय्यद, स्वराज शिंदे, इमरान शेख, अविनाश सोनवणे, उदय ववले, सुनील जाधव, अंकुश दिघे, रमजान सय्यद, धनाजी तांबे, सुनिल अडागळे इत्यादी सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### पोलिसांच्या रेकॉर्डवर आरोपींची 'कुंडली'

**पिंपरी : दैनिक संध्या**

गुन्ह्यात अटक झालेल्या आरोपीचे केवळ नाव, पत्ता आणि छायाचित्र एवढीच माहिती आता पोलिसांच्या रेकॉर्डवर राहणार नाही. आरोपीचा आयरिस स्कॅन, फोटोग्राफ, जैविक नमुना (DNA), शरीरावरील ओळखचिन्ह, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी, नातेवाइकांची माहिती आणि डेमोग्राफिक डेटा अशी विविध स्वरूपातील माहिती एकाच ठिकाणी संग्रहित केली जाणार आहे. त्यामुळे आरोपीची अक्षरशः 'कुंडली' पोलिसांच्या रेकॉर्डवर उपलब्ध होणार आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय स्तरावर यासाठी मापन संकलन युनिट (MCU) कार्यान्वित करण्यात आले आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभाग, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हास्तरावर मापन संकलन युनिट तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या अंतर्गत किवळे येथील पोलिस उपआयुक्त कार्यालयात हे युनिट सुरू करण्यात आले आहे. ९ ऑगस्ट २०२६ पासून ते कार्यान्वित करण्यात आले आहे. पोलिस ठाण्यांमध्ये गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपींना मोजमापे नोंदविण्यासाठी युनिटमध्ये हजर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. युनिटच्या दैनंदिन कामकाजाची वेळ सकाळी १० ते रात्री ८ अशी निश्चित करण्यात आली आहे. आरोपीला युनिटमध्ये आणताना संबंधित तपासी अधिकारी अथवा अंमलदार उपस्थित असणे अनिवार्य करण्यात आले आहे. आरोपीला योग्य पोलिस बंदोबस्तात आणण्याची जबाबदारी संबंधित प्रभारी अधिकारी आणि तपासी अधिकाऱ्यांवर राहणार आहे. महिला आरोपी असल्यास तिच्यासोबत महिला पोलिस अधिकारी अथवा महिला अंमलदार उपस्थित ठेवण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. आरोपीला युनिटमध्ये आणताना तपासी अधिकाऱ्यांनी संबंधित गुन्ह्याची एफआयआर आणि अटक फॉर्म सोबत आणणे आवश्यक आहे. अटक फॉर्ममध्ये आरोपीची आवश्यक वैयक्तिक आणि ओळखविषयक माहिती पूर्णपणे भरलेली असणे अपेक्षित आहे. तसेच, तपासी अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव, मोबाईल क्रमांक, सेवार्थ आयडी आणि ई-मेल आयडी असणे आवश्यक करण्यात आले आहे. आरोपीसोबत तपासी अधिकारी अथवा अंमलदार हजर राहणे अनिवार्य असल्याने मोजमाप नोंदविताना आवश्यक माहितीची तत्काळ खातरजमा करता येणार आहे. या प्रणालीमुळे आरोपीची ओळख अधिक अचूकपणे निश्चित करणे, त्याचा गुन्हेगारी पूर्वेतिहास पडताळणे तसेच अन्य गुन्ह्यांच्या तपासात त्याच्याशी संबंधित माहिती तत्काळ उपलब्ध करून घेणे पोलिसांना सोपे होणार आहे. अटक आरोपींची मोजमापे गोळा करणे, जतन करणे, आवश्यकतेनुसार प्रसारित करणे आणि नियमानुसार नष्ट करणे यासाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

### पिंपरीत भाज्यांचे दर कडाडले; आले ३०० रुपये किलो, कोबी-फ्लॉवरही महाग

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी: पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवार (दि. १६) बाजारात आल्याचा भाव वधारला होता. आले ३०० रुपये प्रतिकिलो भाव झाला आहे. पावसामुळे आवक कमी झाल्याने आल्याच्या दराने झेप घेतली आहे. गेल्या आठवड्यात आल्याचा भाव १८० ते २०० रुपये किलो दराने विक्री केली जात होते. आठवडाभरात किलोमागे १०० ते १२० रुपये वाढ झाली आहे. कोबी आणि फ्लॉवर या भाज्या ४० ते ५० रूपये किलो दराने होत्या. त्या आज ८० ते १०० रूपये किलो दराने विक्रीस होत्या; मात्र पालेभाज्यांचे दर स्थिर होते. कोथिंबीर, मेथी, पालक, शेपू १५ - २० रुपये प्रति जुडी विक्री केली जात होती. रानभाज्यांमध्ये कर्टुलीची आणि घोळाच्या भाजी देखील क्वचित दिसत आहे. रविवारी बाजारात गवार ८० रुपये, शेवगा १०० रुपये, टोमॅटो ३०, भेंडी ६०, फ्लॉवर ८०, कोबी ७०, मिरची ६०, गाजर ४०, शिमला ६०, लसूण १८० ते २००, आले २८० - ३०० रुपये प्रतिकिलो. वांगी ४० रुपये, काकडी ३०, कारले ६०, कांदे २५ ते ३० रुपये किलो, बटाटा २५ ते ३०, बिन्स १००, पावटा ८०, लाल भोपळा ५०, घोसाळी ४०, दोडका ६०, तोंडली ६०, बीट ४०, दुधी ५०, घेवडा १०० रुपये प्रतिकिलो विक्री केली जात आहे. पिंपरी बाजारातील दर पालेभाज्यांचे दर (रु.) प्रतिजुडी कोथिंबीर १५ - २० रुपये, मेथी २०, पालक २०, शेपू २०, राजगिरा २०, पुदिना १५, मुळा २५ रुपये, चवळई १५, लाल माठ १५, करडई २०, कांदापात २०, करडई १५, आळू पाने १० रुपये जुडी, आंबट चुका १५ रुपये. फळभाज्यांचे : किलोचे भाव (किरकोळ रु.) शेवगा १२० रुपये, गवार १००, पावटा ८० - ९०, तोंडली ८०, बीट ४० - ५०, दोडका ७०, कारली ७० , भरताची वांगी ५०, भेंडी ७०, मिरची ७०, फ्लॉवर १००, कोबी १००, वांगी ५०, घोसाळे ५०, पडवळ ५०, दुधी भोपळा ५०, पापडी ९०, पावटा १००, सुरण ९०, मद्रास काकडी ३०, राजमा १०० - १२०, बिन्स १००, गाजर ६०, टोमॅटो ४० रुपये प्रतिकिलोचा दर आहे.



# लोणावळा हाऊसफुल्ल!

## भुशी धरणावर पाय ठेवायलाही जागा नाही; पर्यटनस्थळांवर तुफान गर्दी

■ लोणावळा(दै. संध्या)

रविवारच्या साप्ताहिक सुटीमुळे दोन दिवस लोणावळा परिसरात मोठ्या संख्येने पर्यटक आले होते. यामुळे शहर व आजूबाजूचा ग्रामीण परिसर हाऊसफुल्ल झाला होता. शहरातील भुशी धरणावर तर अक्षरशः पाय ठेवण्यास देखील जागा नव्हती. तुंगार्ली धरणावर देखील पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. लोणावळा शहर व ग्रामीण भागातील सर्वच पर्यटनस्थळे पर्यटकांच्या गर्दीमुळे तुडुंब भरली होती.

लायन्स पॉईंट, शिवलिंग पॉईंट याठिकाणीदेखील हजारो पर्यटक आले होते. खंडाळ्यातील राजमाची गार्डन, ड्युक्स नोज पॉइंट, आई एकवीरा देवी मंदिर परिसर, भाजे लेणी, लोहगड किल्ला, सहारा पुलासमोरील धबधबा येथे पर्यटकांची तोबा गर्दी झाली होती.

शहरात 15 ऑगस्टच्या दिवशी व रविवारी होणारी पर्यटकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता मोठा पोलिस बंदोबस्त शहरात व पर्यटनस्थळांवर तैनात करण्यात आला होता. मुख्यालयातून आलेले व स्थानिक पोलिस ठाण्याचे असे 180 पोलिस कर्मचारी व अधिकारी बंदोबस्त कामी नियुक्त करण्यात आले होते.

लोणावळा शहरामध्ये निर्माण झालेली कोंडी सुरळीत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलिस रस्त्यावर तैनात होते. मोठ्या प्रमाणात वाहनांच्या रांगा लागून सुद्धा वाहने थांबून राहत नव्हती. हळूहळू वाहने पुढे सरकत होती.

15 ऑगस्ट रोजी दुपारी भुशी धरण भागात झालेली गर्दी लक्षात घेता पोलिस प्रशासनाकडून रायवूड येथे सायंकाळी 4 नंतर धरणाकडे जाणारी वाहने बंद करण्यात आली होती. सायंकाळीनंतर धरणाकडून येणाऱ्या वाहनांची मोठी रांग लागली होती. रविवारी सकाळी आठ वाजल्यापासूनच भुशी धरणावर पर्यटकांची गर्दी झाली होती.

हलक्या स्वरूपात पडणारा पाऊस व धरणाच्या पायऱ्यांवरून झुळुझुळू वाहणार्या पाण्यात बसून पर्यटक भिजण्याचा आनंद घेत होते. दोन्ही दिवस मोठ्या संख्येने पर्यटक आल्याने स्थानिक नागरिकांच्या व्यवसायालादेखील मोठी चालना मिळाली. अगदी हातगाडीवर चहा, मक्याचे कणीस, वडापाव, भजी विक्री करणाऱ्यांपासून मोठ्या हॉटेल व रिसॉर्ट तसेच चिक्की दुकाने, खासगी बंगले या सर्वांनी समाधान व्यक्त केले आहे.

पर्यटक वाहनांमुळे व गर्दीमुळे मात्र सर्वसामान्य नागरिकांना घराबाहेर पडणे मुश्किल झाले होते.

### वाहनतळाची गरज

लोणावळा शहरात पर्यटक वर्षभर येत असतात. येणाऱ्या पर्यटकांना चांगल्या सुविधा देण्यासोबतच स्थानिक नागरिकांची गैरसोय होणार नाही या दृष्टिकोनातून स्थानिक लोणावळा नगर परिषद, जिल्हा प्रशासन व शासनाच्या वतीने योग्य उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

## नागरी समस्या सोडवू व क्रीडा संकुल उभारू - आ. जगताप

■ पिंपरी (दै. संध्या)

सातत्य, सचोटी आणि सत्यता याचा अवलंब करा, व्यसनापासून दूर रहा असे मार्गदर्शन आमदार शंकर जगताप यांनी केले. तसेच पिंपळे निलख परिसरातील पाणी, कचरा, वाहतूक या नागरी समस्या सोडवून भावी नगरसेवक सचिन साठे यांनी मागणी केल्याप्रमाणे येथे उत्तम क्रीडा संकुल लवकरच उभे करू अशी माहिती आ. जगताप यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दिली.



पिंपळे निलख येथे शनिवारी (दि. १५) सचिन साठे सोशल फाउंडेशन च्या वतीने गुणवंत विद्यार्थी व विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार अश्विनी जगताप, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष सचिन साठे, शिवव्याख्याते नितीन बानुगडे-पाटील, गुणवंत विद्यार्थी, विशेष सत्कारार्थी पंचक्रोशीतील जेष्ठ नागरिक पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन व गौरव करण्याची २२ वर्षांची अखंड परंपरा जपणाऱ्या सचिन साठे सोशल फाऊंडेशनच्या वतीने स्वागत करताना सचिन साठे यांनी सांगितले की, गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देतानाच सामाजिक, क्रीडा, आध्यात्मिक, आरोग्य व उद्योजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचाही यावेळी गौरव करण्यात आला. एक चांगला सुसंस्कृत माणूस म्हणून घडवण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

यावेळी इयत्ता १० वी, तेजस किशोर उपाध्याय याला स्व. सुरज काळुराम नांदगुडे स्मृती पुरस्कार, रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच इयत्ता १२ वी, आकांशा अरुण यादव याला स्व. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप स्मृती पुरस्कार, रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच इयत्ता १० वी, विराज उदय पाटील, राधेश्वरी अमोल कुरेकर, राही संतोष जाधव आणि अदिती महेश भोसले आणि इयत्ता १२ वी, प्रभव दिपक रुस्तागी, अनुष्का हेमंत गुंजाळ, श्रेया निकुंजकुमार बनकर व जान्हवी प्रदीप पाटील या गुणवंत विद्यार्थ्यांचाही पुरस्कार, स्मृतीचिन्ह स्कूल बॅग देऊन गौरव करण्यात आला.

## मावळच्या तीन पोलिसांचा केंद्र शासनाकडून गौरव

■ वडगाव मावळ (दै. संध्या)

मावळ तालुक्यात पोलिस प्रशासनामध्ये कर्तव्यदक्ष म्हणून काम केलेले पोलिस उपनिरीक्षक प्रकाश वाघमारे यांना अति उत्कृष्ट सेवा पदक तर पोलिस हवालदार अमोल कसबेकर व सचिन गायकवाड यांना उत्कृष्ट सेवा पदक केंद्र शासनाकडून जाहीर झाल्याने मावळ तालुक्यात विशेषतः पोलिस प्रशासनाच्या दृष्टीने अभिमानास्पद ठरले आहे.

प्रकाश वाघमारे यांनी तब्बल ३५ वर्षे कर्तव्यनिष्ठ, गुणवत्तापूर्ण सेवा बजावली आहे. त्यांना यापूर्वी राष्ट्रपती पदकही मिळाले आहे. बारामती शहर पोलिस ठाण्यामध्ये कार्यरत असताना आगीच्या भीषण दुर्घटनेत स्वतःच्या जीवाची पर्वा न करता तीन नागरिकांचे प्राण वाचवून त्यांनी आपल्या धाडसी वृत्तीचे दर्शन घडविले. तसेच, खून, दरोडे, जबरी चोरी, घरफोडी यांसारखे गंभीर गुन्हे उघडकीस आणण्यात आणि आरोपींना जेरबंद करण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. शंभरहून अधिक गावठी पिस्तुले त्यांनी जप्त केली आहेत. तसेच, आंतरराज्य गुन्हेगारी टोळ्यांविरुद्धही त्यांनी उल्लेखनीय कारवाई केली आहे. सचिन गायकवाड यांचा अनेक गंभीर गुन्हे उघडकीस आणण्यात मोठा सहभाग असून, तांत्रिक तपासात त्यांचे विशेष कौशल्य असल्याने सायबर गुन्ह्याच्या तपासात त्यांचा विशेष हातखंडा आहे. त्यामुळे त्यांची सायबर गुन्ह्यांच्या तपासत वेगळी ओळख आहे. यापूर्वी २०२० मध्ये त्यांना पोलिस महासंचालक पदक मिळाले आहे. दरम्यान, उत्कृष्ट सेवा पदक जाहीर झालेले प्रकाश वाघमारे हे यापूर्वी वडगाव मावळ पोलिस ठाण्यात बराच कालावधी कार्यरत होते.

# फ्लायओव्हर धोक्याच्या छायेत; काँक्रीटच्या भिंतींना वड-पिंपळांचा विळखा

## लटकते ड्रेनेज पाइपही अपघाताला निमंत्रण; संरचनात्मक सुरक्षेसाठी तातडीच्या उपाययोजनांची गरज

■ पिंपरी (दै. संध्या)


पिंपरी शहरातील अनेक प्रमुख रस्ते आणि महामार्गांवरील फ्लायओव्हरच्या भिंतींवर वड-पिंपळाची झाडे उगवून चांगलीच मोठी झाली आहेत. मातीच्या कुंडीत नव्हे, तर थेट काँक्रीटच्या भिंतीत रुजलेली ही झाडे आता संरचनेच्या सुरक्षिततेसाठी धोक्याची घंटा ठरत आहेत.

त्यातच फ्लायओव्हरवरील पावसाचे पाणी निचरा करण्यासाठी बसविण्यात आलेल्या काही पाइपलाइन तुटलेल्या अवस्थेत धोकादायकरीत्या लटकताना आढळून आल्या आहेत. वादळी वारे आल्यास हे पाइप खालून जाणाऱ्या दुचाकीस्वार अथवा वाहनांवर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे काँक्रीटमध्ये रुजलेली मुळे आणि लटकते पाइप अशा दुहेरी धोक्याच्या छायेतून वाहनचालकांची वाटचाल सुरू असल्याचे समोर आले आहे.

वड आणि पिंपळाची झाडे भेगा, फटी आणि संरचनेतील छोट्या जागांमध्येही सहज रुजतात. सुरुवातीला छोटे रोप दिसते. मात्र, कालांतराने त्याची मुळे विस्तारत जाऊन भिंतींवर दबाव निर्माण करू शकतात. काही ठिकाणी झाडांचे खोडही मोठे झाल्याचे दिसत आहे.

फ्लायओव्हरच्या भिंतींवर तडे जाणे, संरक्षणात्मक टाईल्स निखळणे आणि काँक्रीटचा भाग खराब होणे अशा समस्या काही ठिकाणी दिसून येत आहेत. या नुकसानीमागे झाडांची मुळे कारणीभूत आहेत का, याची तांत्रिक तपासणी होणे आवश्यक आहे.





फ्लायओव्हरवरील पावसाचे पाणी खाली वाहून नेण्यासाठी बसविण्यात आलेल्या पाइपलाइनपैकी काही पाइप तुटून धोकादायक पद्धतीने लटकताना आढळून आले आहेत. हे पाइप मजबूतपणे बांधलेले नसतील किंवा वादळी वाऱ्याचा तडाखा बसला तर ते थेट खाली जाणाऱ्या दुचाकीस्वार अथवा वाहनांवर कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे झाडांच्या मुळांमुळे संरचनेला संभाव्य धोका असतानाच लटकत्या पाइपमुळे वाहनचालकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित यंत्रणेने अशा पाइपची तातडीने तपासणी करून धोकादायक भाग दुरुस्त करणे गरजेचे आहे. फ्लायओव्हरचे स्ट्रक्चरल ऑडिट करताना झाडांच्या वाढीचा आणि मुळांच्या विस्ताराचा स्वतंत्रपणे विचार केला जातो का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. संबंधित यंत्रणांनी केवळ झाडांची छाटणी न करता मुळांमुळे संरचनेला झालेल्या संभाव्य नुकसानीचीही तपासणी करणे गरजेचे आहे. भिंतीवर उगवलेले रोप दुर्लक्षित राहिले तर काही वर्षांत त्याचे मोठ्या झाडात रूपांतर होते. त्यामुळे फ्लायओव्हरवरील अशा झाडांचे तातडीने सर्वेक्षण करून तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपाययोजना करण्याची गरज आहे. शहरातील उड्डाण पुलांवर झाडे वाढत असतानाही संबंधित यंत्रणांचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. त्यातच पावसाचे पाणी वाहून नेणारे पाइप तुटलेल्या अवस्थेत लटकताना दिसत असल्याने वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. अपघात किंवा संरचनेचे नुकसान झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्यापूर्वीच प्रतिबंधात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित या प्रश्नावर महापालिका प्रशासन नेमकी कधी जागे होणार?, हा सवाल उपस्थित होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नायगाव येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**पुरंदर : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्याच्या पुर्व भागातील नायगाव येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.या दिवशी सकाळी प्रभात फेरी काढण्यात आली.मुलांनी घोषणा दिल्या.यावेळी ग्रामपंचायत येथील ध्वजारोहन प्रशासक क्रांती पाटोळे यांच्या हस्ते करण्यात आले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नायगाव येथील ध्वजारोहन नायगाव सोसायटीचे संचालक संजय होले यांनी केले.श्री सिद्धेश्वर विद्यालय येथील ध्वजारोहन विठाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल कामठे यांनी केले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौंडकरवाडी येथील ध्वजारोहन सिद्धेश्वर सोसायटीचे अध्यक्ष मुगुट खेसे यांनी केले.प्राथमिक आरोग्य उपकेंद्र येथील ध्वजारोहन प्रा.डॉ. यशवंत कड यांनी केले. पशुचिकिस्तालय येथिल ध्वजारोहन ग्रामपंचायत सदस्य सुभाष चौंडकर यांनी केले. या दिवशी मुलांनी कवायत केले.भाषणे केली.विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी गावातील कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुरंदर तालुका युवक अध्यक्ष अजिक्य कड तर चौंडकर वाडी येथील कार्यक्रमाचे अध्यक्ष रघुनाथ खेसे यांनी भूषविले.प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हा सरचिटणीस सदाशिव खेसे, माजी सरपंच बारीकराव खेसे होते. यावेळी जेष्ठ नागरिक,गावातील पदाधिकारी,महिला, ग्रामस्थ,तरुण,शिक्षक,मुले आदि मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.



### चाकणला ज्ञानवर्धिनी विद्यालयात स्वातंत्र्यदिन दिमाखात साजरा

**चाकण : दैनिक संध्या**

स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कुल आणि स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज मध्ये स्वातंत्र्य दिन मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण चाकण नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक विष्णू गोरे होते. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, नगराध्यक्षा मनिषा गोरे, संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, संचालक अंकुश पवार, दत्तात्रय गोरे, माणिक गोरे, कार्याध्यक्ष ओंकार गोरे, नगरसेवक गुलाब शेवकरी, आदर्श मुख्याध्यापक विजयकुमार तांबे, उद्योजक मनोहर शेवकरी, रोनक गोरे, विशाल बारवकर, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिंसिपल माधुरी गोरे, पर्यवेक्षक सविता कुमकर, ज्योती अनाप, प्रेरणा काळे, पालक प्रतिनिधी गणेश कड, अंकुश बोऱ्हाडे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ व तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### शिरूरमध्ये अज्ञात वाहनाची जुपिटरला जोरदार धडक; ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू

**चाकण : दैनिक संध्या**

अहिल्यानगर–पुणे महामार्गावर शिरूर-बाबुरावनगर येथील व्हिजन शाळेच्या पुढे पुलाच्या अलीकडे रविवारी (दि. १६ ऑगस्ट) भरधाव अज्ञात कारने जुपिटर



दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ३० वर्षीय दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला.अपघातानंतर धडक देणारा वाहनचालक मदत न करता घटनास्थळावरून फरार झाला. या अपघातात सोमनाथ विठ्ठल बोऱ्हाडे (वय ३०, रा. बोऱ्हाडमळा, शिरूर, ता. शिरूर) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोमनाथ बोऱ्हाडे हे रविवारी दुपारी त्यांच्या जुपिटर दुचाकीवरून बाह्य महामार्गावरून जात होते. व्हिजन शाळेच्या पुढे पुलाच्या अलीकडे ते आले असता भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.धडक इतकी भीषण होती की, बोऱ्हाडे रस्त्यावर फेकले गेले. अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.या अपघातात जुपिटर दुचाकीचेही मोठे नुकसान झाले आहे.

# शिवसेनेचे पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरातील पदाधिकारी जाहीर

■ जुन्नर : (दै. संध्या)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व शिवसेना नेते खासदार संजय राऊत साहेब यांच्या सूचनेनुसार पुणे जिल्हा सह संपर्कप्रमुख दिलीप दादा ब्राह्मणे, जिल्हा संघटक शरद अण्णा चौधरी, उपजिल्हाप्रमुख अँड. जयराम तांबे ,जिल्हा उपसंघटक सूर्यकांत ढोले, जुन्नर विधानसभा प्रमुख आनंद भाऊ रासकर , जुन्नर तालुका प्रमुख भास्कर शेठ गाडगे,जुन्नर शहर प्रमुख श्री शैलेश बनकर यांच्या मार्गदर्शना खाली जुन्नर शहरातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या जुन्नर शहरातील संघटनेची नव्या जोमाने बांधणी करण्याच्या उद्देशाने 'सन्मान निष्ठावंतांचा – शिवसैनिक पदनियुक्ती सन्मान सोहळा' शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता हाय स्पीड स्किल हब, कोंडाजी बाबा डेरे आश्रमाशेजारी, जुन्नर येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात जुन्नर शहरातील उपतालुका प्रमुख व महानगर संघटक,उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, शाखा प्रमुख, अशा विविध पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

महानगर संघटक -बाळासाहेब सदाकाळ उपतालुका प्रमुख- जालिंदर रासकर उपशहर प्रमुख- संजय घोणे, सलीम मुलाणी, संजय ताजवे आणि बाळासाहेब पऱ्हाड- युवासेना जुन्नर शहर युवाअधिकारी- आशीर्वाद गाडेकर विभाग प्रमुख- मुकेश जाधव, कुमार खत्री, करण धोत्रे, आकाश परदेशी, श्रीकांत साळवे, किरण कर्डीले, सतीश वर्पे, अनिकेत कुटे आणि संदीप ताजणे

शाखा प्रमुख- सुनील बनकर, संदेश होगे, रोहन कर्डीले, बाळासाहेब मंडलिक, सौरव तिकोणे, शिरीष ससाणे, सचिन शिंदे, विकास शिरसागर, सचिन जाधव, कैलास शेरकर, अभिलाष परदेशी, ओंकार खिलारी, स्वप्नील सरजिने आणि निरज भगत यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाला शिवसेना पुणे जिल्हा सहसंपर्कप्रमुख श्री. दिलीपदादा बाम्हणे, पुणे जिल्हा संघटक श्री. शरद अण्णा चौधरी, उपजिल्हाप्रमुख ॲड. जयरामशेठ तांबे, जुन्नर विधानसभा प्रमुख श्री. आनंदभाऊ रासकर, तालुकाप्रमुख श्री. भास्करशेठ गाडगे, जुन्नर विधानसभा संघटक श्री. संदीपभाऊ ताजणे कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती दिलीप डुंबरे आणि तालुका संघटक राहुलभाऊ सुकाळे उपसभापती श्री. अमित ढोले, युवासेना उपजिल्हाधिकारी




श्री. शांतारामशेठ सावंत,उपतालुका प्रमुख धोंडिभाऊ पानसरे व विभाग प्रमुख घोलप सर यांची प्रमुख उपस्थिती होती

यावेळी मार्गदर्शन करताना पुणे जिल्हा सहसंपर्कप्रमुख दिलीपदादा बाम्हणे आणि उपस्थित मान्यवरांनी जुन्नर शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने व जोमाने काम करण्याचे आवाहन केले. शहरातील प्रत्येक विभाग, शाखा आणि तळागाळातील नागरिकांपर्यंत पक्षाचे विचार व भूमिका पोहोचवून संघटना अधिक सक्षम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

शहरप्रमुख श्री. शैलेश रमेश बनकर यांच्या पुढाकाराने व सर्व शिवसैनिकांच्या सहकार्याने या पदनियुक्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास जुन्नर शहरातील माजी नगरसेविका सुवर्णाताई बनकर,गौरीताई शेटे,ज्योतीताई पऱ्हाड, महानगर समन्वयक शिवदर्शन खत्री,माजी शहरप्रमुख समीर भगत, निष्ठावंत शिवसैनिक साईनाथ डोके.अमोल बनकर,प्रसाद बनकर,वैभव चौगुले,दिनेश ताजणे,सुदर्शन भगत,मोहन दिवेकर, शिवानंद ढेकणे,ओंकार भुजबळ,ऋषिकेश भुजबळ,अक्षय कुटे,जालिंदर साळवे शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडी, सोशल मीडिया तसेच विविध अंगीकृत संघटनांचे आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे जुन्नर शहरातील शिवसेना संघटनेला नव्या नेतृत्वाची व संघटनात्मक बळकटीची जोड मिळाली असून आगामी काळात पक्षाचे कार्य अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

## साकुर्डे विद्यालयात ध्वजारोहण उत्साहात

■ साकुर्डे (दै. संध्या)

येथील मातोश्री जिजाई सोपानराव जाधव माध्यमिक विद्यालयामध्ये स्वतंत्र भारताचा 80 वा स्वातंत्र्य दिनानिमित स्वर्गीय एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संतोष जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की तुम्ही उद्याच्या उज्वल भारताचे आधारस्तंभ आहात. जीवनात उच्च ध्येय ठेवा. आपल्या आई वडिलांचा व मोठ्यांचा आदर करा व आपल्या ध्येयप्राप्ती साठी जीवाचे रान करा.स्वर्गीय एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच पिण्याच्या पाण्यासाठी कुलर बसवून देण्याचे जाहीर केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साकुर्डे गावचे सरपंच राजेंद्र जाधव होते. माजी सरपंच राजेंद्र सस्ते, रमेश जाधव, ध्रुव



शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सुरेश जाधव,किसन देशमुख, प्रकाश जाधव, विठ्ठल चव्हाण, राहुल भोंगळे, सुरेश तात्या सस्ते, वामन सस्ते,दत्तात्रय जाधव,पुणे जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडीचे सचिव तानाजी झेंडे,आदी उपस्थित होते. विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक तानाजी झेंडे यांनी विद्यालयास पेव्हिंग ब्लॉक बसवून दिले व माजी विद्यार्थी सोमनाथ जाधव यांनी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने दीड लाख खर्च करून विविध खेळांची मैदाने तयार करून दिल्याबद्दल त्यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश कामथे तर. सूत्रसंचलन किशोर दरेकर व विद्या पवार आभार श्वेता काटे व माधुरी चव्हाण यांनी मानले

## अलंकापुरीत नागदेवतेची सनई-चौघड्यांच्या गजरात मिरवणूक

■ आळंदी (दै. संध्या)

श्रावण महिन्यातील पहिला महत्त्वाचा सण असलेल्या नागपंचमीचा उत्सव तीर्थक्षेत्र आळंदीत भक्तिमय वातावरणात पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने नागदेवतेची सनई-चौघड्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. जुन्या नगरपरिषदेच्या जवळील जागेत नागदेवतेचे विधिवत पूजन करण्यात आले. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या सेवेत असलेल्या स्थानिक आळंदीकर मानकरी कुटुंबातील कुऱ्हाडे पाटील, घुंडरे पाटील आणि चिताळकर पाटील कुटुंबातील महिलांनी नागदेवतेची पूजा केली. दूध, साखर, लाह्या, आघाडा आणि दुर्वा अर्पण करून नागदेवतेचे पूजन करण्यात आले. यानंतर नागदेवतेची मिरवणूक लक्ष्मीनारायण मंदिर आणि



राम मंदिर परिसरात नेण्यात आली. तेथेही विधिवत पूजन करण्यात आले. मिरवणुकीनंतर नागदेवतेचे माऊली मंदिरातील पालखी मंडपात आगमन झाले. यावेळी नागदेवतेचे पूजन करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्यात आला. दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. नागपंचमीच्या माध्यमातून नाग या प्राण्याबद्दल समाजात आदर व पूज्य भावना रुजविण्याची परंपरा जपली जात आहे.

## चाकणला साखळी उपोषणात घुमणार टाळ मृदुंगाचा गजर

■ चाकण (दै. संध्या)

उद्योग पंढरीचे नाक असलेल्या चाकण आणि परिसरातील नित्याच्या वाहतूक कोंडीमुळे उद्योगनगरीची बदनामी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद सदस्य गणेश बोत्रे यांनी मंगळवार (दि.१८) व बुधवार (दि.१९) या दोन दिवशी साखळी उपोषणाचे आयोजन केले आहे.



या उपोषणाला समाजातील विविध स्तरातून, विशेषतः वारकरी संप्रदायाकडून मोठा पाठिंबा मिळत आहे. काही वर्षांपूर्वी खेड तालुक्यात डाऊ कंपनी विरोधात आंदोलन करण्यात आले होते. आणि या आंदोलनात वारकऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. ज्यामुळे आंदोलन यशस्वी होऊन डाऊ कंपनीला गाशा गुंडाळून जावे लागले होते. आता या वाहतूककोंडी विरोधातील आंदोलनात वारकरी सहभागी होत असल्याने या आंदोलनाची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे. संत तुकोबारायांच्या भूमीतील वारकरी संप्रदाय या आंदोलनात सक्रियपणे सहभागी होणार आहे. दोन दिवस टाळ - मृदुंगाच्या गजरात आणि भजनांच्या माध्यमातून वारकरी समाज या उपोषणाला पाठिंबा देणार आहेत. पुरुष आणि महिला वारकरी यात सहभागी होणार असून, महिला वारकरी देखील भजनांद्वारे आंदोलनात आपला सहभाग नोंदवतील. औद्योगिक परिसर हा देहूच्या पंचक्रोशीचा एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळे तीर्थक्षेत्र देहू देवस्थान, भामचंद्र डोंगर सप्ताह समिती आणि भंडारा डोंगर देवस्थान यांसारख्या संत तुकाराम महाराजांच्या तपोभूमीतील देवस्थानांनीही या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. त्याचप्रमाणे बोत्रे यांच्या या आंदोलनाला विविध ग्रामपंचायतींनीही ठराव करून सक्रिय पाठिंबा दर्शवला आहे. अनेक कंपन्यांचे प्रतिनिधी, मनुष्यबळ विकास अधिकारी, कामगार संघटनांचे प्रतिनिधी, ट्रान्सपोर्ट व्यावसायिक, शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी, महिला बचत गट आणि खाजगी वाहतूकदार यांनीही या उपोषणाला पाठिंबा दिला आहे. या सर्व घटकांच्या सक्रिय सहभागामुळे आंदोलनाची व्याप्ती वाढली आहे.

### कोंडी आता सहन करण्यापलीकडे गेली

"चाकण भागात वाहतूक कोंडी आता सहन करण्यापलीकडे गेली आहे. उद्योगांवर आणि सामान्य नागरिकांवर विपरीत परिणाम होत आहे. या समस्येवर तातडीने तोडगा काढण्यासाठी आम्ही हे उपोषण पुकारले आहे."

- गणेश बोत्रे, जिल्हा परिषद सदस्य

दरम्यान, साखळी उपोषणाद्वारे चाकण भागातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा व्हावी आणि उद्योगांना तसेच नागरिकांना दिलासा मिळावा, अशी प्रमुख मागणी आहे. या आंदोलनामुळे प्रशासनावर दबाव येऊन वाहतूक कोंडीची समस्या लवकरच सुटेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## चाकणला वरिष्ठ महाविद्यालयात पुस्तकांचे वाटप

■ चाकण (दै. संध्या)

चाकण शिक्षण मंडळाच्या येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात ललिता मोतीलाल सांकला फाउंडेशनच्या वतीने होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना धनादेश, विद्यावेतन व पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात आले.

चाकण रोटरी क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले, सचिव डॉ. भरत राऊत, चाकण शिक्षण मंडळाचे कार्यकारी विश्वस्त मोतीलाल सांकला, सचिव डॉ. अविनाश अरगडे, उद्योजक अभिमन्यू शेलार, संतोष सांकला, वैशाली ओसवाल, मनाली सांकला आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. अविनाश अरगडे यांनी यावेळी ललिता सांकला यांच्या कार्याचा गौरव



केला. मनाली सांकला यांनी त्यांच्या मातोश्री स्व.ललिता सांकला यांच्या आठवणींना उजाळा दिला. चाकण रोटरी क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना यावेळी धनादेश व शैक्षणिक पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

प्राचार्य डॉ. राजेश लाटणे यांनी प्रास्ताविक, तर प्रा. अभिजित बेंडाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. उमेश भोकसे यांनी स्वागत केले. प्रा. कैलास अस्तरकर यांनी आभार मानले.

## पुरंदर तालुक्यातील नायगाव येथे शैक्षणिक संकुलाचे उद्‌घाटन

■ जेजुरी (दै. संध्या)

पद्मविभूषण डॉक्टर सायरस पूनावाला यांच्या आर्थिक सहकार्यातून पुरंदर तालुक्यातील नायगाव येथे उभारण्यात आलेल्या शैक्षणिक संकुलाचे उद्‌घाटन विलु पुणावाला ,ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी

जसविंदरसिंग नारंग व अपर्णा भावे यांच्या हस्ते करण्यात आले. अक्षरसृष्टी NGO व राऊंड टेबल राऊंड टेबल 15 यांच्या प्रयत्नातून श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट यांच्या माध्यमातून नायगाव येथे शैक्षणिक संकुलाची निर्मिती करण्यात आली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी पद्मविभूषण डॉक्टर सायरस पूनावाला यांच्या मदतीतून अनेक विद्यालयांची निर्मिती करण्यात आली असून पुरंदर मधील विद्यार्थ्यांनी नायगाव शैक्षणिक



संकुलात शिक्षण घेऊन उत्तम प्रकारे यश संपादन करावे, अक्षरसृष्टी संस्था व राऊंड टेबल ट्रस्ट यांच्या प्रयत्नातून उत्तम शाळा निर्माण झाल्याचे नारंग यांनी सांगितले. अक्षरसृष्टी संस्थेचे अध्यक्ष सिद्धनाथ पवार यांनी संस्थेच्या माध्यमातून गेल्या 26 वर्षापासून विद्यार्थी विकास, ग्राम समृद्धी, महिला सक्षमीकरण व वाचन संस्कृतीच्या वृद्धीसाठी काम करण्यात येत आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी कंपनी सीएसआर च्या माध्यमातून अनेक उपक्रम संस्था राबवत असते.

## श्री कानिफनाथ महाराज प्रगट दिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

■ पुरंदर (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर श्री नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्ट, बोपगाव यांच्यावतीने श्री कानिफनाथ महाराज प्रगट दिन सोहळा रविवार दि. १६ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वा. मोठ्या थाटामाटात व उत्साही वातावरणात साजरा केला. श्री कानिफनाथ महाराज प्रगट दिन सोहळा कार्यक्रमाचे संयोजन श्री नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्ट अध्यक्ष- सुरेश नानासाहेब फडतरे फडतरे,उपाध्यक्ष -दिपक किसनराव फडतरे,सचिव - महादेव हरिश्चंद्र फडतरे, खजिनदार -सोनबा कान्हू फडतरे, विश्वस्त -ज्ञानोबा रामचंद्र फडतरे, जयवंत कृष्णा फडतरे, नितीन गणपत फडतरे, मंगेश आनंदराव फडतरे, रमेश बापूसाहेब फडतरे, संतोष गोठणे यांनी केले.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# स्वातंत्र्यदिनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची मोठी घोषणा

## ‘विकसित गोवा 2037’चा रोडमॅप, रोजगार, पायाभूत सुविधा, क्षिण, पर्यटन आणि खाण व्यवसायावर भर

■ पणजी (दै. संध्या)

८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पणजी येथे झालेल्या मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभानंतर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी गोमंतकीयांना संबोधित केले. भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाला अभिवादन केले. त्यानंतर ‘विकसित भारत २०४७’ आणि ‘विकसित गोवा २०३७’ या उद्दिष्टांचा पुनरुच्चार करत राज्य सरकारने गेल्या काही वर्षांत केलेल्या कामांचा आढावा घेतला आणि पुढील वाटचालीची दिशा स्पष्ट केली.

मुख्यमंत्री म्हणाले की, आपण स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्षात प्रवेश केला असला तरी हे स्वातंत्र्य लाखो स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि बलिदानामुळे मिळाले आहे. त्यामुळे स्वातंत्र्याचे जतन करण्याची आणि देशाला अधिक सक्षम करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे.

केंद्र सरकारने ‘विकसित भारत २०४७’चे ध्येय ठेवले असून, गोवा सरकारने ‘विकसित गोवा २०३७’चे उद्दिष्ट निश्चित केले आहे. सरकारच्या सर्वांगीण विकास आराखड्याच्या माध्यमातून हे उद्दिष्ट वेळेआधी पूर्ण करण्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.



आर्थिक शिस्त आणि जबाबदार वित्तीय व्यवस्थापनामुळे गोव्याने सलग पाचव्या वर्षी महसुली अधिशेष नोंदवला असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. २०२२-२३ मध्ये केंद्र सरकारकडून भांडवली गुंतवणुकीसाठी २,०५० कोटी रुपयांचा निधी मिळाला. नीती आयोगाच्या ‘फिस्कल हेल्थ इंडेक्स’मध्ये गोव्याला देशात दुसरे स्थान मिळाले असून, अतिरिक्त कर्ज न घेता आर्थिक कारभार चालवणे ही राज्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या १२ वर्षांत गोव्यात सुमारे २९२ किलोमीटर राष्ट्रीय महामार्गांचे काम पूर्ण झाल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मोपा लिंक रोड, बिचोली बायपास, उड्डाणपूल आणि उन्नत रस्त्यांमुळे प्रवास अधिक सुलभ झाला आहे. भविष्यातही नवीन पूल आणि रस्त्यांची कामे सुरू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या राज्यांमध्ये गोवा अग्रस्थानी असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. २१ सरकारी शाळांचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. ‘विद्या समीक्षा केंद्रा’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष ठेवले जात आहे. ५०० शाळांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), रोबोटिक्स आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण सुरू करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन देण्यासाठीही विशेष उपक्रम राबवले जात आहेत. गोवा कर्मचारी निवड आयोगामार्फत पारदर्शक पद्धतीने हजारो युवकांना सरकारी नोकऱ्या देण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. गोवा ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या माध्यमातूनही रोजगार उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### ‘स्वयंपूर्ण गोवा’ आणि ‘व्होकल फॉर लोकल’

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘आत्मनिर्भर भारत’ आणि ‘व्होकल फॉर लोकल’ संकल्पनेनुसार गोवा सरकार स्थानिक उत्पादने, कारागीर, शेतकरी आणि लघुउद्योगांना प्रोत्साहन देत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. ‘स्वयंपूर्ण गोवा’ अभियानाच्या माध्यमातून हजारो लाभार्थी स्वावलंबी झाले असून, महिला-केंद्रित योजनांनाही मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. ‘गोवा ऑनलाइन’ पोर्टल, मुख्यमंत्री शिष्यवृत्ती पोर्टल आणि मुख्यमंत्री कल्याण पोर्टल यांसारख्या डिजिटल सेवांमुळे नागरिकांना घरबसल्या सरकारी सेवांचा लाभ मिळत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी १९३० हेल्पलाइन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. खनिज उद्योग पुन्हा सुरू करण्यासाठी सरकारने १८ खाण ब्लॉक्सचा लिलाव पूर्ण केला असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. काही ठिकाणी काम सुरू झाले असून उर्वरित खाणीही टप्प्याटप्प्याने सुरू होतील.

## थोडक्यात पण महत्वाचे

### १ सप्टेंबरपासून अभियान

मुंबई : महसूल विभागांतर्गत प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे परस्पर सहमतीने आणि तडजोडीने निकाली काढण्यासाठी राज्यभरात दि. १ सप्टेंबर २०२६ ते दि. ३१ मार्च २०२७ या कालावधीत ‘महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान’ राबविण्यात येणार आहे. महसूल विभागामार्फत यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या अभियानात मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) तसेच अपर जिल्हाधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या सर्व प्रकारच्या महसुली दाव्यांचा आणि अपिलांचा समावेश असेल. सर्व स्तरांवर तीन महिन्यांतून एकदा महसूल लोक अदालत आयोजित करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. ज्या अर्धन्यायिक न्यायालयात किंवा कार्यालयात महसुली दावा प्रलंबित असेल, तेथे दोन्ही पक्षकारांना स्वतः किंवा त्यांच्या वकिलांमार्फत तडजोडीसाठी अर्ज सादर करता येईल. प्राप्त अर्जांची छाननी करून दोन्ही पक्षांच्या संमतीची खात्री केली जाईल आणि त्यांच्याकडून कायदेशीर तडजोडनामा घेण्यात येईल. निश्चित केलेल्या लोक अदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षांच्या सहमतीने अंतिम आदेश पारित करून प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढण्यात येईल. पक्षकारांना नोटीस देणे, अर्ज स्वीकारणे, अर्जांची छाननी, तडजोडनामा तयार करणे, पूर्वतयारी बैठक घेणे आणि प्रत्यक्ष महसूल लोक अदालत आयोजित करणे यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वेळापत्रक निश्चित करण्यात येईल. जमिनींशी संबंधित महसुली दावे दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने पक्षकारांचा वेळ आणि पैसा खर्च होतो. एका स्तरावरील निकालानंतर अपील किंवा पुनरीक्षण अर्ज दाखल झाल्याने प्रकरणे वर्षानुवर्षे सुरू राहतात. विधी सेवा प्राधिकरणाच्या लोक अदालतीच्या धर्तीवर परस्पर तडजोडीतून ही प्रकरणे निकाली काढल्यास पक्षकारांचा वेळ आणि पैसा वाचण्याबरोबरच अर्धन्यायिक यंत्रणेवरील ताणही कमी होणार आहे.

### चक्क रोडरोलरच चोरला!

वास्को : कार, दुचाकी किंवा एखादी महागडी वस्तू चोरीला गेल्याचे आपण नेहमी ऐकतो; मात्र वास्कोमध्ये चक्क भलामोठा रोडरोलरच चोरीला गेल्याचा प्रकार समोर आला आहे. चिकोळणा-बोगमाळो येथे रस्त्याकडेला पार्क केलेला रोडरोलर चोरट्याने क्रेन आणि अवजड ट्रेलरच्या मदतीने पळवून नेला. वास्को पोलिसांनी तातडीने तपास करत संशयिताला अटक केली असून चोरीला गेलेला रोडरोलरही हस्तगत केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी साडेसातच्या सुमारास ही चोरी झाली. कुकळी येथील सूरज फळदेसाई यांच्या मालकीचा रोडरोलर चिकोळणा-बोगमाळो रस्त्याच्या कडेला पार्क करण्यात आला होता. संशयित नझिर शेख (रा. मांगोरहील, वास्को) याने क्रेनच्या मदतीने रोडरोलर ट्रेलर ट्रकमध्ये चढवला आणि तो तेथून घेऊन गेला. चोरी केल्यानंतर हा रोडरोलर बिर्ला परिसरात ठेवण्यात आल्याचे तपासात समोर आले. रोडरोलर चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर मालकाने बुधवारी वास्को पोलिस स्थानकात तक्रार दाखल केली. तक्रार मिळताच पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. बुधवारी रात्री मांगोरहील येथून नझिर शेख याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने रोडरोलर चोरीची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

# नागरिकांना अत्याधुनिक व दर्जेदार शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध होणार

■ नाशिक (दै. संध्या)

नागरिकांना अधिक सुरक्षित, आधुनिक आणि दर्जेदार शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय आरोग्ययंत्रणा सक्षम करण्यात येत आहे. अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा, आवश्यक उपकरणे तसेच प्रशिक्षित मनुष्यबळाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यास शासनाचे प्राधान्य असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

येवला येथील उपजिल्हा रुग्णालयातील मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे उद्‌घाटन मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीश शिंपी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. रमाकांत सोनवणे, निवासी वैद्यकीय अधिकारी संदीप सूर्यवंशी, अनंत पवार यांच्यासह रुग्णालयातील डॉक्टर्स, परिचारिका, अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री भुजबळ म्हणाले, येवला उपजिल्हा रुग्णालयात सुमारे २ कोटी ३५ लाख रुपये खर्चातून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर सुविधेमुळे रुग्णालयातील शस्त्रक्रिया सेवा अधिक आधुनिक, सुरक्षित, स्वच्छ आणि रुग्णाभिमुख होण्यास मदत होणार आहे. या मॉड्युलर ऑपरेशन थिएटरची उभारणी आधुनिक वैद्यकीय मानके व आवश्यक तांत्रिक निकषांचा विचार करून करण्यात आली आहे.

# परभणी गुंतवणूक परिषदेतून १,६०० कोटींची गुंतवणूक

## विकसित व अग्रेसर परभणीसाठी प्रयत्न करणार, १५ हजारावर रोजगार निर्मिती

■ चंद्रपूर (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात परभणी जिल्ह्यात उद्योगवाढीसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यास शासनाचे प्राधान्य असून, जिल्ह्यात विविध उद्योगांच्या माध्यमातून 1 हजार 622 कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक होणार आहे.

आज परभणी गुंतवणूक परिषदेच्या माध्यमातून 162 उद्योजकांसोबत सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून 15 हजार 617 स्थानिकांसाठी रोजगार उपलब्ध होणार आहेत. येत्या दसऱ्यापर्यंत या उद्योगांच्या इमारत बांधकामाची पायाभरणी करण्यात येईल. तसेच या गुंतवणुकीतून स्थानिक उद्योजकांना चालना मिळेल, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने आयोजित ‘इन्व्हेस्ट इन परभणी’ अर्थात परभणी गुंतवणूक परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी खासदार रामराव वडकुते, जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण, सहायक आयुक्त संजय भुरेवाल, सहायक आयुक्त अमोल बळे, सहायक उद्योग अधिकारी प्रभाकर वटाणे, भावना बोर्डीकर, उद्योजक निलेश त्रिभुवन, धीरेन गिलानी, बिपीन इंगोले, सुषमा मोरधानिया, बाळासाहेब गिते, संतोष एकलारे यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात देश आणि राज्य प्रगतीपथावर असून, यामध्ये परभणी जिल्ह्याला सक्रियपणे सहभागी होऊन मोलाचा वाटा उचलायचा आहे. त्यांच्या माध्यमातून विकसित व अग्रेसर परभणीसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आपण म्हणू तशी परभणी घडवायची असून, प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर होण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले.शासनाच्या विविध योजनांचा लाभ स्थानिक उद्योजकांना मिळवून देण्यासाठी प्रशासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

# शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा : भुजबळ

■ नाशिक (दै. संध्या)

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवनात आवश्यक असणारी सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्यावतीने राष्ट्रीय वयोश्री योजनेसह विविध योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत 60 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगाचे जीवन अधिक सुलभ, सुरक्षित व स्वावलंबी व्हावे, यासाठी दैनंदिन जीवनात आवश्यक असलेली विविध सहाय्यभूत साधने मोफत उपलब्ध करून दिली जातात. या योजनेसह शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र ज्येष्ठ नागरिकांनी व दिव्यांगांनी घ्यावा, असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.



येवला येथील माऊली लॉन्स येथे मंत्री भुजबळ यांच्या हस्ते राष्ट्रीय वयोश्री योजनेंतर्गत ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना मोफत सहाय्यभूत साहित्याचे वाटप करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. यावेळी कृषी बाजार समितीचे सभापती वसंत पवार, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी दिपक पाटील, तहसीलदार आबा महाजन, गट विकास अधिकारी संदीप वायाळ यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच लाभार्थी, नागरिक उपस्थित होते. मंत्री भुजबळ म्हणाले, दिव्यांगाना सेवासुविधा मिळण्यासाठी नाशिक येथे प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र मंजूर करण्यात आले आहे. तसेच वयोमानानुसार ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन शासनामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना कानाचे मशीन, चालण्यासाठी काठी व कुबड्या, चष्मा, व्हीलचेअर, कॉमर्ड चेअर, इलेक्ट्रिक सायकल, वॉकर तसेच आवश्यकतेनुसार इतर सहाय्यभूत साधने मोफत उपलब्ध करून दिली जातात.

# निरोगी महाराष्ट्र-सुदृढ महाराष्ट्र’चा संकल्प : प्रकाश आबिटकर

■ नाशिक (दै. संध्या)

ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्तरावर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असून आर्थिक परिस्थितीमुळे राज्यातील कोणताही गरीब रुग्ण उपचारांपासून वंचित राहू नये, हा शासनाचा प्रयत्न आहे. खासगी रुग्णालयांमध्ये उपलब्ध असलेल्या आधुनिक सुविधांच्या धर्तीवर सार्वजनिक आरोग्य विभागातील रुग्णालये अद्ययावत करण्यात येतील. ‘निरोगी महाराष्ट्र-सुदृढ महाराष्ट्र’ घडविण्यासाठी आरोग्य विभाग अधिक सक्षम व लोकाभिमुख केला जाईल, असे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्यात नव्याने उभारण्यात आलेल्या १२४ आरोग्य संस्थांचे तसेच विविध रुग्णालये व आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणाच्या कामांचे लोकार्पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने (दि. १५) करण्यात आले. त्यावेळी आरोग्यमंत्री श्री. आबिटकर बोलत होते. आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्यासह लोकप्रतिनिधी व आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी ऑनलाइन उपस्थित होते.

आरोग्यमंत्री श्री. आबिटकर म्हणाले, १२४ आरोग्य संस्थांचे लोकार्पण हा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दृष्टीने संस्मरणीय क्षण आहे. वैद्यकीय यंत्रसामग्रीच्या अभावामुळे काही ठिकाणी आरोग्य संस्था पूर्ण क्षमतेने कार्यरत नव्हत्या.

# आरोग्य विभागात रिक्त पदे भरण्याची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी

■ सातारा (दै. संध्या)

आरोग्य विभागास आता बाह्यस्रोतांद्वारे पद भरतीसाठी मंजुरी देण्यात आली आहे. या अनुषंगाने आरोग्य विभागाने कार्यवाही करून रिक्त पदे लवकरात लवकर भरावीत तसेच स्मार्ट पी.एच.सी.ची उर्वरित कामे लवकर पूर्ण करावीत, अशा सूचना पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी (दि.१५) दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा आरोग्य अभियानाची बैठक झाली. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या.

बैठकीस जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राहुल जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी महेश खालीपे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

स्मार्ट पी.एच.सी.साठी नियोजन विभागाने दिलेला निधी पूर्ण खर्च करण्यात यावा, अशा सूचना करून पालकमंत्री शंभूराज देसाई म्हणाले, काही पी.एच.सी.ची कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत ती



तातडीने पूर्ण करण्याची कार्यवाही करावी. तसेच ज्या ठिकाणी जुनी इमारत निर्लेखनाचे काम आहे, ते मार्गी लावावे आणि प्राथमिक आरोग्य केंद्राचे दर्जेदार वास्तू उभारण्याची कामे पूर्ण करून मगच नवीन निधी मागणी करावी. यावेळी जिल्हा क्रीडा संकुल समितीचीही बैठक झाली. त्यामध्ये सिंथेटिक ट्रॅक तयार करणे, क्रीडा संकुलातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत.

# चिमूर क्रांती दिनानिमित्त मंत्री अशोक वुईके यांच्याकडून अभिवादन

■ चंद्रपूर (दै. संध्या)

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर हे, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील ऐतिहासिक क्रांतीभूमी म्हणून ओळखले जाते. दरवर्षी 16 ऑगस्ट हा चिमूर क्रांती दिन/शहीद दिन म्हणून पाळण्यात येतो. या अनुषंगाने राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी आज (दि. 16) चिमूर येथे शहीद स्मारकाला अभिवादन करून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली.

यावेळी चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार कीर्तीकुमार भांगडिया, जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, चिमूरचे अपर जिल्हाधिकारी संतोष थिटे, भिसीच्या अप्पर तहसीलदार नीलिमा रंगारी यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते

महात्मा गांधींनी 1942 मध्ये दिलेल्या ‘भारत छोडो’ आंदोलनाच्या हाकेनंतर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रेरणेने चिमूरमध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध आंदोलन तीव्र झाले. 16 ऑगस्ट 1942 रोजी चिमूर येथे स्वातंत्र्यसैनिक आणि नागरिकांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध मोर्चा काढला. ब्रिटिश पोलिसांनी आंदोलन दडपण्यासाठी लाठीमार व गोळीबार केला. या संघर्षात अवघ्या 16 वर्षांचे बालाजी रायपूरकर हुतात्मा झाले. चिमूरच्या क्रांतीने स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. चिमूरने ब्रिटिश सत्तेला थेट आव्हान देत स्वतःला ब्रिटिश राजवटीतून मुक्त केले. चिमूरची क्रांती ही केवळ इतिहासातील घटना नसून स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या क्रांतिवीरांच्या त्याग, शौर्य आणि देशभक्तीचे प्रतीक आहे, असे यावेळी पालकमंत्री डॉ. वुईके म्हणाले. 16 ऑगस्ट चिमूर क्रांती दिनाचे औचित्य साधून भारतीय डाक विभागातर्फे ‘चिमूर क्रांती शौर्यगाथा’ या कव्हरचे पालकमंत्री डॉ. वुईके यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. यावेळी चंद्रपूर डाक विभागाचे अधीक्षक एस. रामाकृष्णा, प्रवर डाकपाल व्ही.पी. भोगे, नागपूर येथील डाक विभागाच्या तृप्ती कापसे, अमोल बावणे, नितीन छापागरे, अमोल भगत, अमन कुमार, ललित बोरकर आदी उपस्थित होते.





# श्रावण उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

■ पुणे (दै. संध्या)

सालाबादप्रमाणे याही वर्षी श्रावण उत्सव दिनांक 17/8/2026 रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दिनांक 16/8/2026 रोजी उत्तर रात्री 10 वाजता श्री सिद्धेश्वर भजनी मंडळ यांचा एक तारी भक्ती संगीताचा कार्यक्रम संपन्न झाला रात्री 11 वाजल्यापासून सकाळी 7 वाजता उत्तरा देवी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने रुद्राभिषेक व महापूजा करण्यात आली

सकाळी 8 वाजता मा. आमदार संजयजी चंदूकाका जगताप व सौ राजवर्धिनी संजय जगताप यांच्या शुभहस्ते महारुद्र अभिषेक व पितळेची सुवर्ण प्रभावळ अर्पण करण्यात आली. सकाळी 8 वाजता महाआरती झाली ही पूजा गणेश सरनाईक काका यांच्या हस्ते करण्यात आली सकाळी 9 वाजता महाप्रसाद फराळाचे वाटप या कार्यक्रमानिमित्त श्री तुषार बंटी जगताप व डॉक्टर सुमित काकडे नंदकुमार जगताप अतुलशेठ जगताप संदिप टिळेकर, संदिप मेरुकर, सुनिलकाका जगताप, मोहनआप्पा जगताप, सुरज उत्तम जगताप याच्या वतिने खिचडी महाप्रसाद वाटप करण्यात आले सर्व सासवड शहर व परिसरातील हजारो नागरिकांनी श्री सिद्धेश्वर महादेवाचे दर्शनाचा व महाप्रसाद फळाचा लाभ घेतला या श्रावण सोमवार उत्सव काळात सासवड पोलीस स्टेशन यांच्या वतीने मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवण्यात आला सासवड नगर परिषदेच्या वतीने मंदिर व मंदिरात जाणाऱ्या रोडची लाईटची व्यवस्था करण्यात आली केतकावळे येथील बालाजी मंदिर व्यवस्थापनचे बाळासाहेब बाटे व सहकारी यांनी मंदिर परिसरातील संपूर्ण स्वच्छता करण्यात आली. धन्यवाद आपलेच. श्री सिद्धेश्वर महादेव देवस्थान मंदिर सासवड सुधार समिती.

# महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर मध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे

■ मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचे आवाहन
■ २१ ऑगस्ट जलसंधारण दिनी राज्यभर आयोजन




■ मुंबई (दै. संध्या)

माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार आहे. शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांत "महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर" या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या उपक्रमात राज्यातील नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले आहे. मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने आयोजन करण्यात आलेल्या या उपक्रमाची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सीक्यूर टूमारो अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे.

राज्यातील सर्व जिल्ह्यांत २१ ऑगस्ट रोजी कमाल तीन किलोमीटर (महा वॉकेथॉन) चालणे आणि मृद व जलसंधारणाची शपथ घेणे असे या कार्यक्रमाचे स्वरूप असल्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांगितले. मंत्री संजय राठोड म्हणाले, शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान "जलसंधारण सप्ताह" आणि १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान "जलसंधारण अभियान" आयोजित करण्यात येत आहे. तर २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांत शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत "महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर" या उपक्रमाचे आयोजन करून जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचे कार्य राज्य शासनाने हाती घेतले आहे. राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे होणार असून प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रमाच्या आयोजनाचे प्रमुख जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी हे असणार आहेत. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सर्व मंत्री, सर्व राज्यमंत्री, राज्यसभा/ लोकसभा/ विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, सर्व जिल्हापरिषद अध्यक्ष/उपाध्यक्ष, सर्व महापौर / उपमहापौर, सर्व नगराध्यक्ष/ उपनगराध्यक्ष, सर्व जिल्हापरिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य, सर्व महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायत सदस्य आणि इतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात येणार आहे.

सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, सर्व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी, जिल्ह्यातील नामांकित व प्रतिष्ठित व्यक्ती / डॉक्टर / कलाकार/ उद्योजक, जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरु युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेड क्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब सदस्य, लायन्स क्लब सदस्य, रनिंग क्लब सदस्य, सायकलिंग क्लब सदस्य, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या, विविध क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप्स, विविध व्यायाम शाळा, स्वयंसेवी संस्था, महिला, राज्याचे नागरिक यांना सहभागी करण्यात येणार आहे.

महा वॉकेथॉन मध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. २१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन मध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र मिळणार आहे. तर प्रथम दहा विजेत्यांना जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तर प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रायोजकाच्या माध्यमातून एकूण ७१,००० रुपये रकमेची रोख बक्षीस देण्यात येणार आहेत. यामध्ये प्रथम पुरस्कार रुपये २५ हजार रुपये व गौरवचिन्ह, द्वितीय पुरस्कार रुपये १५ हजार रुपये व गौरवचिन्ह आणि तृतीय पुरस्कार १० हजार रुपये व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे, तसेच प्रत्यक्ष सहभागींच्या मधून ईश्वरी चिठ्ठीद्वारे सात सहभागींना प्रत्येकी तीन हजार रुपयांचा विशेष पुरस्कार देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सोशल मीडियासाठी #MahaWalkathon, #WalkForWater, #SaveSoilSaveWater हे हॅशटॅग वापरण्यात याव्यात, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले आहे.

## जय मल्हार क्रांती संघटनेच्या राज्य प्रसिद्धी प्रमुखपदी महेंद्र मदने

■ भिगवण (दै. संध्या)



जय मल्हार क्रांती संघटना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक दौलत शितोळे आणि प्रदेशाध्यक्ष अंकुशराव जाधव यांच्या वतीने संघटने च्या महाराष्ट्र राज्य प्रसिद्धी प्रमुखपदी भिगवण स्टेशन ( ता.इंदापुर) येथील महेंद्र वैजयंता बबन मदने यांची निवड करण्यात आली आहे.

संघटनेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणे, सर्वसामान्यांच्या समस्या शासन व प्रशासनापर्यंत पोहोचवणे, सामाजिक न्यायासाठी आवाज उठवणे तसेच संघटनेचे विचार आणि सामाजिक कार्य जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याची जबाबदारी आता मदने यांच्यावर सोपविण्यात आली आहे. सामाजिक आणि वैचारिक चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेत असलेल्या मदने यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आल्याचे जय मल्हार क्रांती संघटना युवकचे मा. अध्यक्ष सुधीर नाईक यांनी सांगितले. या निवडीबद्दल बोलताना महेंद्र मदने म्हणाले, “माझ्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी ही माझ्यासाठी पद नसून एक सामाजिक बांधिलकी आहे. संघटनेची ध्येयधोरणे, विचार आणि समाजहिताचे कार्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी मी प्रामाणिकपणे कार्य करणार आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आणि संघटनेला अधिक सक्षम करण्यासाठी माझे योगदान देईन.” त्यांच्या निवडीबद्दल संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

■ गोजुबावी (दै. संध्या)



न्यू इंग्लिश स्कूल,गोजुबावी येथे १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढली. यावेळी विद्यार्थ्यांनी ‘वंदे मातरम्’ तसेच देशभक्तीपर घोषणा देत संपूर्ण परिसरात देशभक्तीमय वातावरण निर्माण केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.वैशाली बेंडसुरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी स्थानिक स्कूल कमिटी सदस्य,विविध शालेय समित्यांचे सदस्य,माजी विद्यार्थी,पालक, विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर मनोगते व्यक्त केली.तसेच देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली. देशभक्तीपर गीतांवर कवायत सादर केली.क्रांतिकारकांच्या चित्रांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी सादर केले.विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम अतिशय उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात पार पडला. उपस्थित सर्वांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा संकल्प केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### विकासावर विश्वास ठेवत ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश : आमदार शेखर निकम

संगमेश्वर : दैनिक संध्या

संगमेश्वर तालुक्यातील शिवणे येथील ग्रामस्थांनी आमदार शेखर निकम यांच्या नियोजनबद्ध, पारदर्शक व पक्षविरहीत विकास कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजितदादा पवार गट) अधिकृत प्रवेश केला. यावेळी साहिल लिंगायत,संतोष सनगरे, जयवंत सनगरे, महादेव शिरगावकर,संदेश सनगरे, सचिन सनगरे,राजाराम भोजने ,आकाश भेकरे,पराग गुरव,अनिल गेल्ये बाबू गेल्ये, आदी ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. आमदार शेखर निकम यांनी आजवर पक्षभेद न करता रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, ग्रामविकास, महिला सक्षमीकरण व युवकांसाठी विविध विकास कामे सातत्याने मार्गी लावली आहेत. “नागरिक हा विकासाचा केंद्रबिंदू” या भूमिकेतून त्यांनी तालुक्यातील अनेक रखडलेली कामे पूर्णत्वास नेली असून, त्याचा थेट फायदा सामान्य जनतेला मिळत आहे. आमदार शेखर निकम म्हणाले, “माझ्या राजकारणाचा पाया मतदार संघातील प्रत्येक गावाचा विकास हा आहे. गावाचा प्रश्न माझा प्रश्न आहे, आणि तो सोडवताना कोणत्या पक्षाचा आहे हे मी कधीही पाहिले नाही. काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि प्रामाणिक ग्रामस्थांना सोबत घेऊनच मतदारसंघाचा सर्वांगीण विकास घडवायचा आहे. प्रवेशामुळे शिवणे गावात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन अधिक मजबूत होणार असून, आगामी काळात विकासाभिमुख राजकारणाला अधिक वेग मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या प्रवेशप्रसंगी तालुका अध्यक्ष राजेंद्र पोमेंडकर,उपसभापाती प्रफुल्ल बाईत, पंचायत समिती सदस्या आरुषी घवाळी मॅडम,युवक अध्यक्ष प्रतिक साळवी,नितिन भोसले, कोसूंब ग्रामपंचायत सदस्य अमित जाधव,आबा जाधव,स्नेहल गुरव,हातिव तंटामुक्ती अध्यक्ष रेहान गडकरी ओमकार गायकवाड,प्रज्वल जाधव,मारुफ साटविलकर,यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.



### देहदान करणाऱ्या कुटुंबीयांचा मंगळवारी कृतज्ञता सन्मान सोहळा

बारामती : दैनिक संध्या

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती येथील शरीररचनाशास्त्र विभागाच्या वतीने देहदान करणाऱ्या व्यक्तींच्या कुटुंबीयांचा कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी सन्मान करण्यात येणार आहे. हा सन्मान सोहळा सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. आपल्या प्रिय व्यक्तीच्या निधनानंतरही समाजहिताचा विचार करून देहदानाचा निर्णय घेणाऱ्या कुटुंबीयांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी देहदान व अवयवदानाचे महत्त्व आणि त्याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. नागरिकांनी या मानवतावादी कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले आहे.

## रिलस्टारसह सात जणांना अटक

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यातील डेक्कन जिमखाना परिसरात शनिवारी पहाटे एका तरुणावर झालेल्या हल्ल्याने खळबळ उडाली होती. ‘फ्लाईंग जिप्सी’ कॅफेबाहेर पडत असताना सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर अथर्व जगताप याला एका टोळक्याने अडवलं होतं. त्यानंतर झालेल्या वादातून त्याच्यावर शस्त्राने हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणी आता डेक्कन पोलिसांनी खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला असून, रील क्रिएटर माधवी कुंभारसह सात जणांना अटक केली आहे. हल्लेखोरांनी कॅफेमध्ये घुसून त्याला शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली.

## वीरपत्नी श्रीमती सविता विजय राजपुरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

■ १०० विद्यार्थिनींच्या स्वप्नांना मिळाली ‘Two Wheels of Hope’ची साथ
■ KUMSS संस्थेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा
■ शौर्य, त्याग, शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाचा प्रेरणादायी संगम

■ कान्हाटी (दै. संध्या)

कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था (KUMSS),कान्हाटी येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात विविध उपक्रमांसह साजरा करण्यात आला.यावेळी वीरपत्नी श्रीमती सविता विजय राजपुरे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री. दशरथदादा धुमाळ होते. देशाच्या रक्षणासाठी आपल्या पतींनी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाची साक्षीदार असलेल्या वीरपत्नींच्या हस्ते तिरंगा फडकविण्याचा हा क्षण उपस्थितांसाठी अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.वीर जवानांच्या त्यागाला अभिवादन करताना विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि कर्तव्यभावनेची प्रेरणा निर्माण झाली. स्वातंत्र्य दिनाच्या या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे १०० विद्यार्थिनींना सायकल वाटप संस्थेच्या अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा.श्रीमती सुनेत्रावहिनीसाहेब अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या ‘Two Wheels of Hope’ या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थिनींना शिक्षणासाठी दररोज लांबचा प्रवास करावा लागतो. प्रवासाची अडचण,वेळेचा अपव्यय आणि वाहतुकीची मर्यादित साधने यामुळे त्यांच्या शिक्षणावर परिणाम होऊ नये,तसेच मुलींच्या शिक्षणाला गती,आत्मविश्वास आणि स्वावलंबनाची दिशा मिळावी,या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. सायकल ही केवळ प्रवासाचे साधन नसून एका विद्यार्थिनीच्या शिक्षणाच्या स्वप्नांना गती देणारी आणि तिच्या उज्ज्वल भविष्यातील वाटचालीला दिशा देणारी ‘आशेची दोन चाके’ आहेत, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी संस्थेचे विश्वस्त मा.श्री. दत्तात्रय वाबळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास संजय निर्मल, संस्थेच्या विविध विभागांचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते,सांस्कृतिक कार्यक्रम,भाषणे तसेच विविध उपक्रम सादर करून स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित केला. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचा इतिहास, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि राष्ट्रनिर्मितीतील युवकांची भूमिका याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले.

# पतंगाचा दोर की मृत्यूचा फास? नायलॉन मांजावर पोलिसांचा घाव!

## घराच्या आडोशाला लपवून ठेवलेला प्रतिबंधित नायलॉन मांजा जप्त; विक्रेत्यावर गुन्हा दाखल, आरोपी ताब्यात

**“नायलॉन मांजा विकाल तर पोलिसांची कारवाई टळणार नाही” — बारामती शहर पोलिसांचा स्पष्ट इशारा**

■ बारामती (दै. संध्या)



बारामती शहर व परिसरात प्रतिबंधित नायलॉन/सिंथेटिक मांजाची विक्री, साठवणूक व वापर करणाऱ्यांविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशनने कठोर मोहीम हाती घेतली असून, दिनांक 16 ऑगस्ट 2026 रोजी गुणवडी येथील वायसेवस्ती परिसरात सापळा रचून केलेल्या कारवाईत 16 नग प्रतिबंधित नायलॉन मांजाचे रिल जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणी बारामती शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. 335/2026, भारतीय न्याय संहिता, 2023 चे कलम 223 व 125 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस गुन्ह्याच्या पुढील तपासकामी ताब्यात घेण्यात आले आहे.

पतंग उडविण्याचा आनंद काही क्षणांचा असतो; मात्र त्यासाठी वापरण्यात येणारा धारदार नायलॉन किंवा सिंथेटिक मांजा रस्त्यावरून जाणाऱ्या निष्पाप नागरिकाच्या गळ्याला लागल्यास तो क्षणार्धात गंभीर दुखापत किंवा मृत्यूचे कारण ठरू शकतो. दुचाकीस्वार, पादचारी, लहान मुले तसेच पक्षी आणि प्राणी यांच्यासाठी हा मांजा गंभीर धोका निर्माण करतो. त्यामुळे “हा केवळ पतंगाचा दोर नाही; निष्काळजी हातात तो जीवघेणा सापळा ठरू शकतो”, या भूमिकेतून बारामती शहर पोलिसांनी प्रतिबंधित मांजाविरोधात विशेष कारवाई सुरू केली आहे. दिनांक 16/08/2026 रोजी सायंकाळी सुमारे 17.35 वाजता, मौजे गुणवडी गावच्या हद्दीतील वायसेवस्ती येथे प्रतिबंधित नायलॉन मांजाची बेकायदेशीररीत्या साठवणूक व विक्री होत असल्याची माहिती तपास पथकास प्राप्त झाली. प्राप्त माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तातडीने सापळा रचला. कारवाईदरम्यान ओम गणेश वायसे, वय 24 वर्षे, रा. गुणवडी वायसेवस्ती, ता. बारामती, जि. पुणे याच्या ताब्यातून प्रतिबंधित नायलॉन मांजाचे वेगवेगळ्या रंगांचे 16 नग रिल, प्रत्येकी अंदाजे 400 रुपये किमतीचे, असा एकूण 6,400 रुपये किमतीचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला.

सदर कारवाईनंतर पोलीस कॉन्स्टेबल गिरीश गणपत नेवसे, ब.नं. 478 यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. 335/2026 नोंद करण्यात आला आहे. आरोपीस पुढील कायदेशीर तपासकामी ताब्यात घेण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार ज्ञानदेव क्षीरसागर, ब.नं. 375 करीत आहेत.

प्रतिबंधित नायलॉन मांजा दुकानात उघडपणे विकण्याऐवजी घरातून, गोदामातून, पिशवी किंवा बॉक्समध्ये लपवून अथवा मागणीनुसार गुप्तपणे पुरविला जात असल्यास अशा विक्रीच्या पद्धतींवरही पोलिसांचे लक्ष आहे. नायलॉन मांजाच्या अवैध पुरवठा साखळीचा शोध घेऊन साठवणूक करणारे, विक्रेते, पुरवठादार तसेच ऑनलाइन माध्यमातून त्याची विक्री किंवा पुरवठा करणाऱ्यांविरुद्ध उपलब्ध पुराव्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने जानेवारी 2026 मधील नायलॉन मांजासंदर्भातील प्रकरणांमध्ये या समस्येची गंभीर दखल घेतली आहे. औरंगाबाद खंडपीठाने नायलॉन मांजामुळे नागरिक, पक्षी व प्राण्यांना होणाऱ्या गंभीर दुखापती आणि मृत्यूंचा उल्लेख करून केवळ किरकोळ विक्रेते किंवा वापरकर्त्यांपुरती कारवाई मर्यादित न ठेवता उत्पादन, साठवणूक, वाहतूक, विक्री आणि ऑनलाइन पुरवठ्याची साखळी उद्ध्वस्त करण्यासाठी सातत्यपूर्ण व गुप्त माहितीवर आधारित अंमलबजावणीची आवश्यकता अधोरेखित केली आहे. नागपूर खंडपीठाने स्वतंत्र आदेशात नायलॉन मांजा वापरणाऱ्यास ₹25,000 आणि नायलॉन मांजाचा साठा आढळणाऱ्या विक्रेत्यास ₹2,50,000 दंडाची तरतूद केली असून प्रत्येक उल्लंघन स्वतंत्रपणे दंडनीय असल्याचे स्पष्ट केले आहे. अल्पवयीन व्यक्तीने नायलॉन मांजा वापरल्यास संबंधित दंड पालकांकडून वसूल करण्याचेही निर्देश त्या आदेशात आहेत. त्यामुळे “मला बंदीची माहिती नव्हती”, “फक्त काही रिल ठेवले होते”, “मी स्वतः वापरत नव्हतो” किंवा “घरात ठेवले होते” अशा कारणांमुळे प्रतिबंधित नायलॉन मांजाबाबत कायदेशीर कारवाई टळेल, असा गैरसमज कोणीही करून घेऊ नये. प्रत्येक प्रकरणात उपलब्ध तथ्य, पुरावे, लागू आदेश व कायदेशीर तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

पालकांनी आपल्या मुलांना पतंग उडविण्यासाठी प्रतिबंधित नायलॉन/ सिंथेटिक मांजा उपलब्ध करून देऊ नये आणि त्यांच्याकडून अशा मांजाचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी. नायलॉन मांजाचा वापर करणारी व्यक्ती अल्पवयीन असल्यास दंड पालकांकडून वसूल करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहेत.

बारामती शहर पोलिसांचे नागरिकांना स्पष्ट आवाहन आहे — पतंग उडवा, आनंद साजरा करा; पण कोणाच्याही गळ्यावर, जीवावर किंवा पक्ष्यांच्या पंखांवर मृत्यूचा मांजा सोडू नका. प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक किंवा वापर आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम व प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत इंगवले यांच्या नेतृत्वात तपास पथकातील पोलीस हवालदार श्री. ज्ञानदेव क्षीरसागर व पोलीस शिपाई श्री. गिरीश नेवसे यांच्या टीमने केली. प्रतिबंधित नायलॉन मांजाविरोधातील कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहणार असून, अवैध साठा व विक्री करणाऱ्यांनी कायद्याची अंमलबजावणी टाळता येईल अशा भ्रमात राहू नये.